



# दैनिक चालु वार्ता







* पुणे * वर्ष : २ * मुख्य संपादक : डि.एस.लोखंडे पाटील * अंक : ३३३ * मंगळवार, दि.२७ जून २०२३ * पाने : ४ * किंमत रु.३ * RNI No.: MAHMAR/2021/82895

* Chief Editor : D.S.Lokhande Patil * Pune * Vol 2 * Issue 333 * Tuesday 27 June 2023 * Pages 4 * Price Rs.3 * RNI No.: MAHMAR/2021/82895 * E-mail : dainikchaluwartha@gmail.com


दिवस : 25° उच्च   सूर्योदय : १३ तास १४ मिनिटे   उगवणे : 06:00 AM मावळणे : 07:14 PM
रात्र : 23° किमान   सूर्यास्त : १२ तास १८ मिनिटे   उगवणे : 12:36 AM मावळणे : 12:53 AM
पेट्रोल - रू. १०५.९८/-   डिझेल - रू. ९२.५०/-   सीएनजी - रू.७९.००/-   एलपीजी गॅस - रू.१,१०६.००/-

LIVE
२४k सोने प्रति १० ग्रॅम - रू. ५९,२८०/-
२२k सोने प्रति १० ग्रॅम - रू. ५४,३५०/-
चांदी प्रति किलो - रू. ७०,९००/-

डॉलर प्रति दर रू.८२.०१/-

## कुठं गटार तुंबलं, कुठं काय झालं याची मी माहिती घेत नसतो !

### शरद पवार यांचा एकनाथ शिंदे यांना टोला ?





**दै.चालु वार्ता, वृत्तसेवा**

**मुंबई :** यंदाच्या मौसमातील पहिल्या पावसाने मुंबईत ठिकठिकाणी पाणी साचलं. त्यामुळे अनेक ठिकाणची वाहतूक खोळंबली. या सगळ्याचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोस्टल रोड आणि मिलन सबवे परिसरात भेट देत आढावा घेतला. त्यावर राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी भाष्य केलं आहे. त्यांनी एकनाथ शिंदे यांना टोला लगावला आहे. पहिल्याच पावसात मुंबईत ठिकठिकाणी पाणी साचलं याबाबत प्रश्न विचारला असता, कुठं गटार तुंबलं, कुठं काय झालं याची मी माहिती घेत नसतो, असं म्हणत शरद पवार यांनी एकनाथ शिंदे यांना टोला लगावला आहे. BRS पक्ष राज्याच्या राजकारणात सक्रीय होत आहे. त्यावर त्यांच्याकडे साधन संपत्ती आहे, याची चिंता नाही. त्यामुळे त्यांनी काय करावं हा त्यांचा अधिकार आहे. त्यांना जर सेवा करायची असेल तर त्यांच्या स्वागत आहे. ते काय करत आहेत, लोक त्याला कसा प्रतिसाद देतील हे निवडणुकीनंतर दिसून येईलच, असं पवार म्हणाले.

# रमेश मोरे अन जया जाधव यांची हत्या का झाली ? नारायण राणेंचा उद्धव ठाकरेंना सवाल !

**दै.चालु वार्ता, वृत्तसेवा**

**मुंबई :** केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. देवेंद्र फडणवीसांच्या कुटुंबाबाबत केलेल्या विधानावरून नारायण राणेंनी उद्धव ठाकरेंना खोचक सवाल विचारला आहे. रमेश मोरे आणि जया जाधव यांची हत्या का झाली? असा प्रश्न नारायण राणेंनी उद्धव ठाकरेंना विचारला आहे. ते रत्नागिरी येथे जाहीर सभेत बोलत होते. नारायण राणे भाषणात म्हणाले, मला उद्धव ठाकरेंना विचारायचं आहे की, तुम्ही आमच्या देवेंद्रजींच्या परिवाराबद्दल बोलता मग रमेश मोरे आणि जया जाधव यांची हत्या का झाली, हे सांगाल का? हे सांगण्याची नैतिकता तुमच्यात



आहे का? हा प्रश्न उद्धव ठाकरेंच्या घरातील आहे. उद्धव ठाकरेंच्या घरातील अंतर्गत प्रश्न असल्यामुळे आमचा सोबती रमेश मोरे आणि जया जाधव गेला. याला कारण हेच लोक आहेत.

आपल्या कुटुंबाबद्दल जरा कुठे काही कळलं की त्याची नकळत हत्या करतात. उद्धव ठाकरे स्वत: हत्या करत नाहीत. ते हत्या हा शब्दही उच्चारत नाहीत. पण हा माणूस खोक्यांवर बोलतो. पण आहो उद्धवजी, आम्ही खोके दिले नसते तर मातोश्रीची पहिली इमारतही उभारली नसती. दुसऱ्या इमारतीचा तर प्रश्नच सोडा. मनोहर जोशींनंतर मी दुसरा नेता आहे, ज्याने खोके द्यायला सुरुवात केली. मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे त्यांच्यावरही नाराज होते. त्यानंतर मी मुख्यमंत्री झालो. तेव्हापासून तुमच्याकडे जे-जे आलं, ते कुठून आलं? त्या बॅगांमध्ये काय होतं? आम्ही प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये अमरुद आणलं होतं का? ते तुम्ही घेतलं. तुम्ही कोणता धंदा किंवा व्यवसाय करता? असा सवालही नारायण राणेंनी उद्धव ठाकरेंना विचारला.

## सामाजिक न्याय दिनानिमित्त मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण !

**दै.चालु वार्ता, वृत्तसेवा**

**मुंबई :** राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणातून सामाजिक उन्नतीकडे जाण्यावर भर दिला होता. आजच्या लोकार्पण सोहळ्यातून आपण त्याच दिशेने प्रयत्न करीत आहोत. मुंबई शहरामध्ये आपण २५० विद्यार्थिनी क्षमतेच्या वसतिगृहाचे लोकार्पण करीत आहोत. या वसतिगृहाला माता रमाई यांचे नाव देण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. सामाजिक न्याय विभागाच्या मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहाच्या लोकार्पण प्रसंगी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. या कार्यक्रमास पर्यटन आणि कौशल्य विकास व उद्योजकता, महिला व बाल विकास मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा,



खासदार राहुल शेवाळे, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, समाजकल्याण विभागाचे आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी राजेंद्र भोसले उपस्थित होते.

**वसतिगृहाला माता रमाई यांचे नाव देणार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते चेंबूर येथील १ हजार मुला-मुलींची विभागीय स्तरावरील वसतिगृहापैकी २५० मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. तसेच दूरदृश्यप्रणालीद्वारे मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, मंगरुळपीर, जि. वाशिम व बार्टी अंतर्गत येरवडा

(पान २ वर...☛)

## प्रस्थापित एसटी संघटनांचा पराभव का झाला?

**दै.चालु वार्ता, वृत्तसेवा**

**मुंबई :** कोविड आणि संपाचे संकटातून पुर्णपणे बाहेर न पडलेल्या एसटी महामंडळाने नुकतेच ७५ वर्षे पुर्ण केले. एसटी महामंडळाच्या या प्रवासात एसटी कामगारांसाठी आजपर्यंत २२ विविध संघटना अस्तित्वात आल्या.कामगारांसाठीचे न्याय हक्काचे लढेही या संघटनांनी दिले. मात्र काल, परवा अस्तित्वात आलेल्या गुणरत्न सदावर्ते यांच्या संघटनेने स्टेट को-ऑपरेटीव्ह बँकेच्या निवडणूकीत या प्रस्थापित संघटनाना धोबीपछाड दिली आहे.त्यामुळे एसटी कामगारांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या या संघटनावर आत्मचिंतनाची वेळ आली आहे. ७० वर्षाची परंपरा असलेल्या या बँकेवर पांरपारीक पध्दतीने इंटक आणि कामगार संघटनेची सत्ता राहीली आहे. मात्र यावेळी पहिल्यांदा



निवडणूकीच्या आखाड्यात उतरलेल्या केवळ वर्षभरापुर्वी स्थापन केलेल्या गुणरत्न सदावर्ते यांच्या एसटी कष्टकरी जनसंघाने नवा इतिहास घडवत प्रस्थापित एसटी संघटनाना धूळ चारली आहे. त्यामुळे एसटीचा संप चिघळवण्यात महत्वाची भूमिका बजावलेल्या गुणरत्न सदावर्ते यांची एसटी कामगारांमधील लोकप्रियता अजून ओसरली नसल्याचे स्पष्ट होते. गेल्या अनेक वर्षापासून एसटी कामगारांच्या महागाई भत्ता, पगार वाढीपासून अनेक प्रश्न प्रलंबित होते. मात्र हे प्रश्नाची सोडवणूक करण्यात प्रस्थापीत कामगार संघटनांचे नेतृत्व अपयशी ठरले. कामगारांच्या प्रश्नावर व्यापक आंदोलनही झाले नाही. याचा फायदा सदावर्ते, आमदार गोपिचंद पडळकर यांच्या नव्याने स्थापन झालेल्या संघटनानी घेतला.

सातवा वेतन आयोग आणि एसटी विलिनिकरणाच्या मुद्यावरुन पाच महिने संप पुकारला. हा संप यशस्वी झाला नाही मात्र कामगारांच्या प्रश्नावर आम्ही लढत असल्याचे ठसवून देण्यात मात्र गुणरत्न सदावर्ते यशस्वी झाले. त्यामुळे कामगारांनी बँकेच्या निवडणूकीत त्यांच्या पॅनलला एकतर्फी विजय मिळवून दिल्याचे विश्लेषक सांगतात.

# विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी राज्यातील सर्व शाळा- महाविद्यालयांमध्ये केलेल्या उपाययोजनांचा अहवाल त्वरित सादर करावा -विधान परिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे

### उच्च व तंत्र शिक्षण आणि शालेय शिक्षण विभागाच्या सोबत विधान भवनात घेतली बैठक

**दै.चालु वार्ता, वृत्तसेवा**

**मुंबई :** राज्यभरात शाळा - महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीनींची संख्या, त्यांना राहण्यासाठी सुरक्षित वसतिगृहे आहेत काय, त्यांच्या आवारात असलेल्या विविध सुविधा, कर्मचारी यांची पुरेशी माहिती आहे का या आणि अशा विविध मुद्द्यांवर आढावा घेण्यासाठी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आज विधान भवनात बैठक घेतली. यापूर्वी घेतलेल्या बैठकांमध्ये दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी काय झाली याचा अहवाल येत्या ३ जुलैपर्यंत सादर करावा. विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठीच राज्यातील सर्व शाळा- महाविद्यालयांमध्ये समुपदेशन आणि तक्रार निवारण कक्ष स्थापन केले त्यांचे काय स्वरूपाचे काम सुरु आहे याबाबत त्वरित अहवाल सादर करावा. शाळांमध्ये शिक्षकांना गुड टच बॅड टच विषयांचे प्रशिक्षण देऊन प्रत्येक शाळेत विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना देखील समुपदेशन करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण द्यावे. यासाठी आठवड्यात किमान दोन तास राखीव ठेवा, असे निर्देश आज त्यांनी शालेय शिक्षण आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

डॉ.गोऱ्हे म्हणाल्या, या विषयात काम करणाऱ्या स्वयंसेवी



संस्था किती आहेत याची माहिती घेण्यात यावी, त्यांनाही याबाबत सहभागी करून घ्यावे. जिथे अशा संस्थाच नसतील तिथे शासनाच्यावतीने पुढाकार घ्यावा, याकरिता शालेय शिक्षण, सामाजिक न्याय आणि महिला बाल कल्याण विभागाने पुढाकार घ्यावा. अनेक शाळांमध्ये समाजकार्याचे शिक्षण घेतलेले शिक्षक आहेत त्यांना सहभागी करून घेण्यात यावे. विद्यार्थिनींवर अत्याचाराच्या घटनांची गंभीर दखल घेऊन त्यावर काय कार्यवाही झाली याचा अहवाल सादर करावा. सायबर गुन्हे, समाज माध्यमांवरून होणाऱ्या विविध तक्रारींची दखल घेण्यासाठी काय यंत्रणा आहे याबाबत अहवाल सादर करावा. राज्यातील सर्व शासकीय आणि खाजगी वसतिगृहांचे अधीक्षक, वार्डन, रेक्टर यांचे या विषयातील प्रशिक्षण लवकरच पुणे येथे आयोजित करण्यात येणार उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर यांनी सांगितले.

राज्य शिक्षण व संशोधन परिषदेच्यावतीने या विषयावर एक माहिती पुस्तिका तयार करण्यात आली आहे. या आधारे सर्व शाळांमध्ये शिक्षकांचे प्रशिक्षण घेण्याची कार्यवाही सुरू असल्याचे सांगण्यात आले.

(पान ४ वर...☛)






## ज्येष्ठ सिने नाट्य अभिनेत्री आशाताई काळे यांना ‘बालगंधर्व जीवन गौरव पुरस्कार’ प्रदान!

***दै.चालु वार्ता, उपसंपादक, पुणे जिल्हा***
***◀शाम पुणेकर▶***

**पुणे :** ‘बालगंधर्व रंगमंदिरात मला चोखंदळ पुणेकर रसिकांनी अत्यंत प्रेमाने आणि कौतुकाने स्वीकारलं. त्याच रंगमंचावर मला जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केलं जातंय याचा अतिशय आनंद झाला. मी मूळची नाटकवाली कलावंत, नंतर बरेच सिनेमे केले.’ असे पुरस्कर्ती आशा काळे यांनी उद्गार काढले. बालगंधर्व परिवाराच्या वतीने आयोजित बालगंधर्व रंगमंदिर ५५ वा वर्धापन दिन सोहळा महोत्सवाचे उद्घाटन आज करण्यात आले. यावेळी आशाताई काळे यांना यंदाच्या जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी माजी आमदार उल्हास पवार, आमदार रवींद्र धंगेकर,अभिनेते स्वप्नील जोशी, अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड, बालगंधर्व परिवाराचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, कवयत्री प्रतिभाताई मोडक, सूर्यादत्ता फाऊंडेशनचे अध्यक्ष संजय चोरडिया आदी उपस्थित होते. आपल्या मनोगतात आशा काळे पुढे म्हणाल्या, ‘बालगंधर्व रंगमंदिरांच्या रंगमंचावर मी ५० वर्षे वावरले. माझ्या अनेक नाटकांचे असंख्य



प्रयोग मी इथे सादर केले. आज पुरस्काराच्या निमित्ताने एक सांगू इच्छिते की बाललगंधर्वांच्या नावाने आज जीवनगौरव मिळत आहे, त्या बालगंधर्वांना मी पाहिले आहे, त्यांनी पाठीवर कौतुकाची थाप देऊन आशीर्वाद दिलेला आहे, आज रसिकांच्या प्रेमामुळे त्याचा पुन्हा एकदा प्रत्यय आला. मला पुणेकरांच्या टाळ्यांची आस लागलेली असायची.

(पान ३ वर...☛)




# सं पा द की य ...

## एकजुटीला वज्रमुठीचे स्वरूप प्राप्त होऊ शकेल ?

काँ पश्चिम बंगाल, बिहार, तेलंगणा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू या राज्यांमधील प्रभावी प्रादेक्षिक राजकीय पक्षांना लोकसभा निवडणुकांपेक्षा विधानसभा निवडणुकीत आपली सत्ता कायम राहील, यालाच प्राधान्य द्यावे लागते. या प्रकारच्या विरोधामुळेच राष्ट्रीय पातळीवर सर्व विरोधी पक्षांचे एकमत होणे अवघड होते. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी काँग्रेस, भाजप आणि डावे पक्ष या सर्वांनाच आपला शत्रू मानतात. सध्या पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीमध्ये भाजप, काँग्रेस आणि डावे पक्ष ममता बॅनर्जी यांना पराभूत करण्यासाठी एकत्र आले आहेत, असा दावाही ममता बॅनर्जी यांनी केला आहे. असे विविध प्रकारचे विरोध निश्चितच विरोधकांचे एकमत होण्यातील अडथळे ठरणार आहेत. येत्या काही दिवसांमध्ये पुन्हा एकदा विरोधी पक्ष शिमला येथे एकत्र येणार आहेत. तोपर्यंत विचारविनिमय होऊन राजकीय पक्ष लवचिकता दाखवून आपल्या भूमिकेत बदल करतील, अशी आशा ठेवावी लागणार आहे. एकूणच या सर्व घडामोडींमध्ये काँग्रेसची भूमिका सर्वात महत्त्वाची असणार आहे. राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेच्या निमित्ताने काँग्रेसला अनुकूल अशी जी वातावरण निर्मिती केली आहे त्याचा फायदा करून घेण्याचे काँग्रेसच्या डोक्यात असताना पडती बाजू घेणारी लवचिकता हा पक्ष दाखवेल का, याबाबतही शंका येते.

भाजपला पराभूत करण्यासाठी विरोधी पक्षांचे नेते एका व्यासपीठावर आले हे सकारात्मक पहिले पाऊल मानावे लागेल. या व्यासपीठावर आलेल्या सर्वच राजकीय पक्षांची आगामी पावले एकाच दिशेने पडतील अशीच आशा आता करावी लागेल. भाजपने विरोधी पक्षांच्या या बैठकीचे वर्णन नाटक मंडळी असे जरी केले असले तरी ही बैठक म्हणजे नाटक नसून एक वास्तव आहे, हे आता विरोधी पक्षांना पटवून द्यावे लागणार आहे. त्यासाठी एकजुटीचा प्रवास एकमताच्या दिशेने व्हायला हवा.

भाजपला पराभूत करायचे असेल तर काँग्रेसने सुमारे २२५ जागांवरच लढावे आणि उर्वरित जागा मित्र पक्षांना द्याव्यात, असे ममता बॅनर्जी यांनी सुचवले आहे. ममता यांनी जो फॉर्म्युला तयार केला आहे तो निश्चितच अभ्यासाअंती केला आहे. ज्या ठिकाणी काँग्रेस निवडून आली आहे किंवा ज्या ठिकाणी काँग्रेस दुसऱ्या क्रमांकावर आहे त्या ठिकाणीच काँग्रेसने निवडणूक लढवावी आणि अन्यत्र जे पक्ष प्रभावी आहेत त्यांच्या पक्षांच्या उमेदवारांना तिकिटे द्यावीत, असा ममता बॅनर्जींचा साधा सोपा फॉर्म्युला आहे. उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेस प्रभावशाली नाही; पण अखिलेश यादवांचा समाजवादी पक्ष प्रभावशाली आहे. साहजिकच उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेस पेक्षाही समाजवादी पक्षाला जास्त महत्त्व देण्यात यावे, असे ममता बॅनर्जी यांनी सुचवले आहे. पण एकेकाळी सयुंक्त पुरोगामी आघाडीचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेस पक्षाला एवढी पडती आणि कमी महत्त्वाची भूमिका घेणे शक्य होणार आहे का, हे सर्वात महत्त्वाचे आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसने ४१० जागा लढवल्या होत्या. आता ममता बॅनर्जी यांच्या फॉर्म्युल्याप्रमाणे हे प्रमाण जवळजवळ निम्म्याने कमी होणार आहे. लोकसभा निवडणुकीत ४०० पेक्षा जास्त जागा लढूनही काँग्रेसला फक्त ५२ जागा जिंकून समाधान मानावे लागले होते.

अशाप्रकारचा निवडणुकीतील यशाचा इतिहास असल्यामुळेच ममता बॅनर्जी यांनी हा फॉर्म्युला सुचवला आहे. भाजपला पराभूत करायचे असेल तर एकास एक उमेदवार देणे गरजेचे आहे, या विषयावर सर्व राजकीय पक्षांचे मत झाले असले, तरी हा एकास एक उमेदवार देताना कोणी मागे हटायचे किंवा कोणी पडती बाजू घ्यायची यावरून आगामी कालावधीमध्ये संघर्ष होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ममता बॅनर्जी असो, नितीशकुमार असो किंवा तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन असो त्यांना आपला गड शाबूत राखण्याचे काम सर्वात प्रथम करायचे आहे. एकीकडे भाजपाचा प्रभाव कमी करत असताना काँग्रेसचा प्रभाव वाढणार नाही याची काळजीसुद्धा त्यांना घ्यावी लागणार आहे. देशातील जी प्रमुख मोठी राज्ये आहेत म्हणजे ज्या राज्यातील मतदारच देशाची सत्ता कोणाकडे असावी हे ठरवतात त्या राज्यांमध्ये अजूनही भाजपचा प्रभाव असल्याने त्या ठिकाणीच विरोधकांची एकजूट दाखवणे जास्त महत्त्वाचेआहे. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक यांसारख्या राज्यांमध्येच भाजपला चांगले यश मिळत असल्याने सत्तेपर्यंत जाणे सोपे आहे.

नितीशकुमार यांनी बोलवलेल्या या बैठकीला देशातील प्रमुख विरोधी पक्षांचे नेते उपस्थित होते. एका अर्थाने ही विरोधी पक्षांची एकजूट मानायला हरकत नाही; पण ज्या कारणासाठी हे सर्व विरोधी पक्ष एकत्र आले आहेत त्यांच्यामध्ये जर भाजपचा पराभव करण्यासाठी एकमत झाले तरच या एकजुटीला वज्रमुठीचे स्वरूप प्राप्त होऊ शकेल. गेली नऊ वर्षे सत्तेत असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपला जर आगामी लोकसभा निवडणुकीत पराभूत करायचे असेल, तर विरोधकांनी एकत्र यायला हवे. यावर जरी सर्वांचे एकमत होत असले तरी या एकत्र येण्याच्या फॉर्म्युल्यावरून विविध प्रकारची मते व्यक्त होत आहेत, हेसुद्धा लक्षात घ्यावे लागेल. ही बैठक पार पडल्यानंतर जी संयुक्त पत्रकार परिषद झाली त्या पत्रकार परिषदेला आम आदमी पक्षाचे नेते आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान उपस्थित नव्हते, हेसुद्धा या ठिकाणी लक्षणीय आहे.

एवढेच नव्हे तर विरोधकांची आगामी बैठक जी शिमला येथे होणार आहे त्या बैठकीला आम्ही उपस्थित राहायचे की नाही याचा विचार आम्हाला करावा लागेल, अशी भूमिकाही आम आदमी पक्षाने घेतली आहे. दिल्ली सरकार आणि केंद्र सरकार यांच्यातील संघर्षांमध्ये काँग्रेसने अद्यापही थेटपणे आम आदमी पक्षाला पाठिंबा न दिल्याची नाराजी अशा प्रकारे केजरीवाल यांनी बोलून दाखवली आहे. या घडामोडीत एक गोष्ट निश्चित लक्षात घ्यावी लागणार आहे की विरोधी पक्षांची एकजूट जर यशस्वी व्हायची असेल तर काँग्रेसला महत्त्वाची भूमिका बजवावी लागणार आहे. एवढेच नाही तर काही प्रमाणात लवचिकताही दाखवावी लागणार आहे. काँग्रेसमधून बाहेर पडून स्वतंत्र पक्ष स्थापन करून स्वतःचा वेगळा ठसा उमटवणाऱ्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी जो फॉर्म्युला सुचवला आहे तो काँग्रेसला मान्य असणार आहे का, हा सर्वात महत्त्वाचा विषय आहे.

**डि. एस. लोखंडे पाटील**
**मुख्य संपादक - दै.चालु वार्ता**

# मुंढवा केशवनगर चौकातील वाहतूक कोंडीने नागरिक हैराण;

## भर पावसात शेकडो लोक उतरले रस्त्यावर

*दै.चालु वार्ता, वाघोली, प्रतिनिधी,*
*◀स्वरूप गिरमकर▶*



**वाघोली :** वर्षानुवर्षांच्या वाहतूक कोंडीमुळे मुंढवा- केशवनगरवासियांचे जगणे असह्य, झाले आहे. आता आमची सहनशीलता संपली आहे. मुंढवा चौकात भूयारी मार्ग अथवा उड्डाणपूल करा तसेच बाधित नागरिकांना भरपाई देऊन येथील रस्त्यांचे रुंदीकरण करा. नाहीतर मनपा आयुक्तालयात हजारो नागरिकांना घेऊन घुसू, असा खणखणीत इशारा भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस संदीप लोणकर यांनी दिला. महात्मा फुले चौक मुंढवा येथे रोजच्या जीवघेण्या वाहतूक कोंडीतुन सुटका होण्यासाठी भुयारी मार्ग अथवा उड्डाणपूल व्हावा तसेच केशवनगरमधील रस्त्यावरील अतिक्रमणे यामुळे अनेक चौकांमध्ये होणारी वाहतूक कोंडी, मुंढवा-केशवनगरमधील रस्ता रुंदीकरणात बाधित नागरिकांना योग्य नुकसान भरपाई मिळण्याकरिता केशवनगरचे माजी उपसरपंच व भाजपा शहर सरचिटणीस संदीप लोणकर यांच्या नेतृत्वाखाली मुंढवा चौकात भर पावसात जनआक्रोश आंदोलन करण्यात आले. यावेळी माजी आमदार योगेश टिळेकर, भाजपा विधानसभा अध्यक्ष संदीप दळवी, महिला आघाडी अध्यक्षा स्वाती कुरणे, गणेश घुले, प्रशांत भंडारी, कुलदीप कोद्रे, अशोक येवले, देवीदास लोणकर, साहेबराव लोणकर, कर्नल सक्सेना, ओंकान्त बोने, सतीश शिरवळे, आरपीआय अध्यक्ष महादेव दंदि, अनिल आबनावें, सागर भंडारी, संतोष माने, नंदकुमार लोणकर, प्रदीप पाटील, सोमलिंग जतकर तसेच विविध सोसायट्यांचे पदाधिकारी आणि मुंढवा केशवनगर परिसरातील शेकडो नागरिक, महिला, युवक यांनी आंदोलनामध्ये आपला सहभाग नोंदवला.

महापालिका प्रशासनाचा तीव्र निषेध व्यक्त केला. पाऊस पडत असतानाही शेकडो आंदोलक उस्फुर्तपणे या आंदोलनात सहभागी झाले होते. पुणे मनपा रस्ते विभाग अभियंता ननावरे यांनी यावेळी निवेदन स्वीकारले तर आंदोलनप्रसंगी मुंढवा पोलीस निरीक्षक विष्णू ताम्हाणे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. पाच वर्ष आमदार म्हणून मुंढवा-केशवनगरसाठी मी काय काम केले हा प्रश्न नागरिकांच्या मनात आहे. महात्मा फुले चौक मुंढवा येथे भुयारी मार्ग अथवा उड्डाणपूल व्हावा यासाठी, मुंढवा-केशवनगरमधील रस्ता रुंदीकरणात बाधित नागरिकांना योग्य नुकसान भरपाई मिळून रुंदीकरणाची काम तातडीने सुरु करण्याबाबत मनपा आयुक्त यांच्याबरोबर तातडीने बैठक घेणार आहे, याबाबत पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचीही भेट घेणार असल्याचे यावेळी माजी आमदार योगेश टिळेकर यांनी सांगितले.

**तर आयुक्तांच्या कार्यालयात घुसून आंदोलन छेडू**

मुंढवा, केशवनगर येथे सातत्याने वाहतूक कोंडी होत असून यात नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. परंतु येथे नियमित होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर महापालिका किंवा पोलीस प्रशासनाकडून आतापर्यंत कोणत्याच ठोस उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे या बेजबाबदार महापालिका प्रशासनाचा निषेध करण्यासाठी पडत्या पावसातही जन आक्रोश आंदोलन करण्यात आले. आजच्या आंदोलनाची दखल घेऊन तात्काळ उपाययोजना केल्या गेल्या नाहीत. तर,मात्र आयुक्तांच्या कार्यालयात घुसून तीव्र आंदोलन करण्यात येईल, असे भाजपा पुणे शहराचे सरचिटणीस संदीप लोणकर म्हणाले.

# जुलै महिन्यात १५ दिवस बँकांना सुट्टी; बँक संबंधीत महत्वाची कामे करून घ्या




*दै.चालु वार्ता, उपसंपादक, पुणे जिल्हा*
*◀शाम पुणेकर▶*

**पुणे :** जून महिना संपायला अवघे काही दिवस उरले आहेत. यानंतर जुलै महिना सुरूहोईल, जो की सुट्ट्यांनी भरलेला असेल. पुढील महिन्यात पुणे मुंबईसह महाराष्ट्रात १५ दिवस बँका बंद राहणार आहेत. अशा स्थितीत तुमचे कोणतेही महत्त्वाचे काम असेल तर ते त्वरित पूर्ण करून घ्या. रिझर्व्ह बँकेने जुलै २०२३ च्या बँक सुट्ट्यांची यादी जाहीर केली आहे. त्यावरून पुढील महिन्यात एकूण १५ दिवस बँका बंद असतील. मोहरमनिमित्तही अनेक ठिकाणच्या बँका बंद राहतील. जुलै महिन्या साठी भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) बँक सुट्ट्यांची यादी जाहीर केली आहे. पारंपारिक साप्ताहिक सुट्यांव्यतिरिक्त केर पूजा, मोहरम आणि आशुरा या सणांमुळे जुलै महिन्यात बँका बंद राहतील. आरबीआयने जारी केलेल्या यादीनुसार जुलै महिन्यात बँकांना १५ दिवस सुट्टी असेल. यामध्ये चौथ्या शनिवार आणि रविवारच्या सुट्टीचाही समावेश आहे. पण याचा अर्थ असा नाही की सर्व शाखांमध्ये १५ दिवस कामकाज बंद राहील. काही बँकांना राज्यानुसार सुट्ट्याही असतात. जे सण महाराष्ट्राच्या संस्कृती मध्ये साजरे होत नाही त्या दिवशी बँका चालू राहतील. पुढील महिन्यात महाराष्ट्रात प्रामुख्याने पुढील कारणाने निमित्त बँकांना सुट्टी असेल. मोहरम, २ जुलै - रविवार,५ जुलै (बुधवार) - गुरु हरगोविंद जी यांची जयंती, ८ जुलै - दुसरा शनिवार, ९ जुलै - रविवार, १६ जुलै - रविवार, २२ जुलै - चौथा शनिवार, २३ जुलै - रविवार, असे विश्वसनीय सूत्रांकडून कळविण्यात आले आहे.

# तब्बल ९० क्विंटल राशनचा तांदूळ काळ्या बाजारात जप्त

*दै.चालु वार्ता,*
*उपसंपादक, परभणी*
*दत्तात्रय वामनराव कराळे*



**परभणी :** रविवार हा सुट्टीचा दिवस. तोच डाव साधत गोरगरिबांचे तोंड मारुन चक्क दिवसा ढवळ्या तब्बल ९० क्विंटल राशनचा तांदूळ काळ्या बाजारात विकण्यासाठी पोबारा झालेला एक टेंपो पोलिसांनी पकडला व चालकाच्या मुसक्या आवळल्या. ज्या पुरवठा अधिकाऱ्याच्या संगनमताने असे षडयंत्र रचण्याचा कुटील डाव सातत्याने खेळला जातोय आणि महिन्याकाठी कित्येकवेळा अशा प्रकारे टेंपोच्या टेंपो भरुन गोरगरिबांसाठी शासनाकडून आणलेला हा सर्व तांदूळ शासनमान्य दुकानातून न वितरित करताच परस्पर काळ्या बाजारात चढ्या भावाने विक्रीसाठी खुलेआम पोबारा केला जातोय, त्यांच्यावर कठोरात ली कठोर कारवाई करुन त्यांचे तात्काळ निलंबन व्हावे, अशी मागणी जनतेतून केली जात आहे. एवढेच नाही तर आता पर्यंत परभणी शहर व जिल्हा कार्यक्षेत्रातंर्गत कार्यरत किती पोलीस ठाण्यातील पोलीसांनी आतापर्यंत अशा प्रकारे पोबारा केला जाणारा तांदूळ पकडला आहे, त्यांची नोंद घेऊन शासनाने तेवढी रक्कम संबंधित पुरवठा अधिकाऱ्यांकडून वसूल केली जावी. त्याशिवाय दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला जाणे आवश्यक ठरले जावे. नानलपेठ पोलिसांच्या सतर्कतेमुळे दिवसा ढवळ्या चोरुन पळविला जाणारा हा ९० क्विंटल राशनचा तांदूळ कुंभार गल्लीत पकडला गेला, त्यामुळे त्यांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. पोउपनि.अजित बिरादार व पो.कर्मचारी शिंदे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे त्यांनी रचलेल्या सापळ्यात अगदी शिताफीने हा तांदूळ पकडण्यात यश मिळविले. एम.एच.०२ ए.वाय.८५७२ क्रमांकाचा टेंपो पकडला तर चालकाच्या मुसक्या आवळल्या. एकूण १९ पोते भरलेला तांदूळ जप्त केला, ज्याचे वजन ९० क्विंटल ०५ किलो एवढे झाले. चालकाला त्याचे नाव विचारले असता मोहम्मद जाफर असल्याचे त्यांनी सांगितले तर धान्याच्या पावत्या मागितल्या असता त्या नसल्याचे सांगून असमर्थता दर्शविली. त्यामुळे पोलिसांचा संशय बळावला जाऊन पकडलेला माल राशनचाच असल्याचे निष्पन्न झाले. पुढील चौकशी व कारवाई करणे शक्य व्हावे यासाठी पोलिसांनी हा मुद्देमाल नानलपेठ ठाण्यात सुरक्षित ठेवला आहे. एकूणच काय तर परभणी जिल्हा पुरवठा अधिकारी, व्यापारी, दलाल व वाहक यांच्या संगनमताने शासनाकडून गोरगरिबांसाठी पाठवलेले स्वस्त धान्य खुलेआम पळवून काळ्या बाजारात चढ्या भावात विक्रीचे प्रकार सर्रासपणे चालत आहेत. पोलीस डोळ्यात तेल घालून सतर्कतेने कर्तव्य पार पाडीत असल्यामुळेच चोरीचे असले प्रकार उजागर होत आहेत. अन्यथा शासनाचा मंजूर सर्वच कोटा कधी पळवून नेला असता याचा थांगपत्ताही लागला नसता. त्याचाच परिपाक म्हणून या मुजोर व मस्तानी अधिकाऱ्यांना सहजगत्या आपले उखळ पांढरे करणे शक्य होत आहे. मशगूल अधिकारी गरिबांची तोंडे मारुन आपणच मालामाल बनले जात आहेत तरीही शासन मात्र हातावर हात ठेवून बघत बसले आहे. त्यामुळेच असले अधिकारी पूरते माजले गेले आहेत. यांना तात्काळ निलंबित करुन घरचा रस्ता दाखविणे गरजेचे असल्याची मागणी जनता करीत आहे.

**पुरवठा अधिकाऱ्याला होतेय निलंबित करण्याची मागणी !**

# पुणे चक्राकार रस्त्यासाठी भूसंपादन प्रक्रियेला गती द्यावी -जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख

**दै.चालु वार्ता, वृत्तसेवा**



**पुणे :** राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेला प्रस्तावित पुणे चक्राकार रस्ता हा प्रकल्प केवळ पुण्यासाठीच नव्हे तर राज्य आणि देशाच्यादृष्टीने महत्त्वाचा प्रकल्प असून सर्व जमीनधारकांना विश्वासात घेऊन या प्रकल्पासाठीच्या भूसंपादन प्रक्रियेला गती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख यांनी दिले. प्रस्तावित पुणे चक्राकार रस्त्याच्या (रिंग रोड) भूसंपादन प्रक्रियेला वेग देण्याच्या अनुषंगाने सर्व संबंधित यंत्रणांचे अधिकारी, भूसंपादन अधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्यासह महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त कार्यशाळा जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. कार्यशाळेस महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे सह व्यवस्थापकीय संचालक कैलास जाधव, अधीक्षक अभियंता राहूल वसईकर, अपर जिल्हाधिकारी हणुमंत अरगुंडे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ.देशमुख म्हणाले, राज्याच्या सकल राज्य उत्पादनामध्ये (जीएसडीपी) पुणे शहर व जिल्ह्याचे १५ टक्के इतके योगदान असते. प्रस्तावित रिंग रोड मुळे वेगवान मालवाहतुकीला गती मिळून यामध्ये अधिक भर पडेल. त्यामुळे या प्रकल्पासाठी गतीने भूसंपादन प्रक्रिया करुन प्रकल्पाला सुरूवात होणे महत्त्वाचे आहे. या प्रकल्पात मोबदल्याची रक्कमही समाधानकारक निश्चित करण्यात आलेली असल्याने संमती करारनामे व संमती निवाड्यांना जास्तीत जास्त प्राधान्य द्यावे. संमती करारनाम्याद्वारे एकूण मोबदल्याच्या २५ टक्के अतिरिक्त वाढीव मोबदला प्राप्त होऊ शकतो. या बाबीसह पारदर्शक पद्धतीने, लोकांच्या सर्व शंकांचे शंभर टक्के निराकरण करत व योग्य दस्ताऐवजीकरण करत काम केल्यास सर्व प्रक्रिया गतीने आणि जमीनधारकांच्या सहकार्याने पूर्ण होईल, असा विश्वासही जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. गेल्या २ वर्षात पुणे जिल्ह्यातील महसूल, भूसंपादन, भूमी अभिलेख, मूल्यांकन आदी सर्वच विभागांनी अतिशय वेगाने काम करुन मेट्रो मार्ग, पालखी मार्ग, पुणे- मीरज नवीन ब्रॉडगेज लाईन, लोणंद- बारामती नवीन रेल्वेमार्ग, चांदणी चौक एकात्मिक प्रकल्प आदींसाठी भूसंपादन प्रक्रियेत वाखाणण्याजोगे काम केले आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठीच्या भूसंपादनासाठीही आवश्यक नोटीसा देणे, गावनिहाय शिबीरे आयोजित करणे आदी प्रक्रिया राबवित जास्तीतजास्त संमतीनिवाडे होतील याकडे लक्ष द्यावे. या प्रक्रियेत ग्रामस्तरीय तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, भूकरमापक यांची अत्यंत महत्वाची भूमिका आहे, असेही ते म्हणाले.

जिल्हा, राज्य आणि देशाच्या प्रगतीमध्ये भर घालण्याऱ्या या प्रकल्पामध्ये आपला सहभाग असेल या अभिमानाच्या भावनेतून या भूसंपादन प्रक्रियेत काम करा, अशा शब्दात महसूल विभाग व सर्व संबंधित अधिकाऱ्यांना डॉ. देशमुख यांनी आवाहन केले. एमएसआरडीसीचे सह व्यवस्थापकीय संचालक कैलास जाधव म्हणाले, हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुण्यामध्ये येणारी ३० ते ४० टक्के वाहतूक बाहेरच्या बाहेरून मार्गस्थ होईल. त्यामुळे शहरातील वाहतूक कोंडीची समस्या, पुणेकरांचा त्रास मोठ्या प्रमाणात कमी होईल. त्यामुळे आता पुणे (पश्चिम) चक्राकार मार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेला गती द्यायची असून पूर्व चक्राकार मार्गासाठीच्या भूसंपादनाबाबतही वेळेत नियोजन करण्यात येईल. एमएसआरडीसी ही राज्यातच नव्हे तर देशात जमीनीचा सर्वाधिक मोबदला देणारी यंत्रणा, असल्याचेही ते म्हणाले. यावेळी एमएसआरडीसीचे अपर जिल्हाधिकारी अरगुंडे यांनी भूसंपादन प्रक्रिया आदीच्या अनुषंगाने यावेळी मार्गदर्शन केले. कार्यशाळेस जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख सूर्यकांत मोरे, सहायक संचालक नगररचना अभिजीत केतकर, भूसंपादन (समन्वय) उपजिल्हाधिकारी प्रविण साळुंखे आदी उपस्थित होते.

# डान्स स्पर्धेत देशात सर्वप्रथम आलेल्या स्नेहाचा खासदार ओमराजे यांच्या वतीने सत्कार

*दै.चालु वार्ता,*
*उपसंपादक, धाराशिव*
*◀नवनाथ यादव▶*



**धाराशिव :** खासदार संपर्क कार्यालयात जिल्ह्याचे खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या वतीने, ऑल इंडिया नॅशनल डान्स स्पर्धत देशात सर्व प्रथम आलेल्या भूम तालुक्यातील पाथरूड येथील स्नेहा महादेव दुधाळ हिचा सत्कार करण्यात आला. दि.६ जून २३ रोजी शिमला येथे पार पडलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातून तब्बल १२०० स्पर्धक सहभागी झाले होते यातून स्नेहाने प्रथम क्रमांकमिळवून धाराशिव जिल्ह्याचे नाव उज्वल केले याबद्दल सार्थ अभिमान असल्याचे खासदार महोदय यांनी सांगितले. याप्रसंगी धाराशिव कळंब चे आमदार कैलास दादा पाटील, युवासेनेचे जिल्हा प्रमुख डॉ चेतन बोराडे,पाथरूड चे सरपंच शिवाजीराव तिकटे, आकाशराव शेळके, ग्रामविकास अधिकरी भागवत राठोड, मारुती दुधाळ, लक्ष्मी दुधाळ आदी उपस्थित होते.

(पान १ वरुन...☛)

## सामाजिक न्याय दिनानिमित्त मागासवर्गीय मुलींच्या...

संकुल, पुणे येथील संघ लोकसेवा आयोगाच्या निवासी प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. तसेच समान संधी केंद्र उपक्रमाच्या मोबाईल ॲपचे उद्घाटनही यावेळी करण्यात आले.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, राजर्षी शाहू महाराज यांचा जयंती दिन हा सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो. शाहू महाराजांसमोर मोठी आव्हाने असताना त्यांनी समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. खेडोपाडी शाळा सुरूकरीत वसतिगृह संकल्पना आणली. त्यामुळे वसतिगृह संकल्पनेचे जनक म्हणूनही त्यांना संबोधले जाते.

राज्यातील विविध समाज घटकातील सनदी अधिकारी व्हावेत यासाठी 'बार्टी', 'सारथी' आणि 'महाज्योती' या संस्थांच्या माध्यमातून युवकांना प्रशिक्षण दिले जाते. या संस्थांमधून विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सुविधा देऊन मुख्य प्रवाहात आणण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. सर्व समाज घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न सरकारमार्फत होत आहे. राज्य शासन अनुसूचित जाती, जमाती व बहुजन वर्गाच्या कल्याणासाठी विविध योजना राबवीत आहे. उच्च शिक्षणासाठी परदेशी पाठविण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढविली आहे. सामाजिक न्याय, उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, इतर मागास विभाग, शालेय शिक्षण विभाग, कौशल्य विकास आदी विभागांमार्फत विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले जात आहेत, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

# गो सेवकावर होणारे हल्ले थांबवा व त्यांना मदत करा मुख्यमंत्री याच्या कडे मागणी

*दै.चालु वार्ता, कंधार, प्रतिनिधी,*
*◀बाजीराव गायकवाड▶*



**नांदेड :** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांना विश्व हिन्दू परिषद बजरंग दला कडून किनवट तालुक्यातील शिवनी आपारावपेठ येथे गो सेवकावर झालेल्या हल्याच्या संदर्भात निवेदन देण्यात आले. व या हल्यात मृत पावलेल्या आणि जख्मी असलेल्या गो सेवकांना शासनाकडून आर्थिक मदत मिळावी, गो सेवकावर हल्ला करणाऱ्या कसायाना कड़क आणि कठोर कार्यवाही व्हावी आशी मागणी ही करण्यात आली. महाराष्ट्रात गोवंश कायदा असताना सुद्धा खुलेआम गोवंश ची हत्या होते यावर कड़क अंमलबजावणी करावी असे निवेदन देण्यात आले यावेळी जिल्हा मंत्री शशिकांत पाटिल गजानन पांचाळ, राजेश देशमुख, गणेश कोकुलवार, डॉ रविकुमार चटलवार, श्रीराज चक्रवार, महेश देबड़वार, प्रशांत दासरवार हे उपस्थित होते.

# युनीक अकॅडमी तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा व पालक मेळावा संपन्न

*दै.चालु वार्ता, देगलूर, प्रतिनिधी,*
*◀संतोष मंनधरणे▶*

**देगलूर :** दि.२५ जुन २०२३ रोजी देगलुर येथील युनीक अकॅडमी तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा व पालक मेळावा थाटात संपन्न झाला. सोहळ्याची सुरूवात डॉ.सुनील जाधव यांनी प्रार्थना गीत गायन करत दिप प्रज्वलन, सरस्वती पुजनाने झाली. सोहळ्याचे अध्यक्ष स्थान दत्तौपण्त गुरुजीनी भूषवले. प्रमुख पाहुणे लोकनेते अविनाश भाऊ नीलमवार, निमा जिल्हा उपाध्यक्ष डॉ राहुल माका, लक्ष्मणराव कन्धारकर, पत्रकार संतोष मनधरने, संभाजी ब्रिगेड उप शहर अध्यक्ष डॉ.सुनील जाधव, मुबिन सर, परमेश्वर इंगोले, विश्वनाथ माका, फुलारी काका, बीरादार सर, संभाजी ब्रिगेड जिल्हा संघटक बालाजी जाधव सर, दुडकावार सर, दिलीप बिरादार सर, जिजाऊ ब्रिगेड च्या वैशाली सुनील जाधव, यशमवार ताई यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक सूर्यकांत इंगोले सर यांनी केले. यात त्यांनी त्यांच्या त्यांच्या द्वारे राबवल्या जाणाऱ्या सर्व उपक्रमावर प्रकाश टाकुन गुणवंत विद्यार्थ्यातुन राष्ट्र सशक्तीकरण करण्याचे अविरत कार्य करणार असे






प्रतिपादन केले. यानंतर युनीक अकॅडमी मधे शिकुन ज्या विद्यार्थ्यांनी राज्यात, जिल्हात, तालुक्यात वेगवेगळ्या परीक्षा मधे ज्यास्त गुण घेऊन कुणी नीट, बी.टेक कॉम्प्युटर साइन्स, /जे ई ई मेन, डरीं एुरा, स्पर्धा परिक्षा मधे यश मिळवले व यशाच्या शिखरावर भरारी घेतली असे तन्मय राहुल माका, कुणाल विश्वनाथ माका, केतन जाधव, वैष्णवी दुडकावार, साक्षी दिलीप बीरादार, श्वेता अशोक पाटील, श्रुतीका यशमवार, प्राची बोइन वाड, मोहीत अविनाश नीलमवार, अनंता सुनील जाधव या गुणवंत विद्यार्थ्याचा पदक देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी तन्मय माका, वैष्णवी, श्वेता पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी प्रमुख वक्ते मुबिन सर यांनी विस्त्रूत मार्गदर्शन केले. पालक अविनाश नीलमवार, डॉ. सुनील जाधव यांनी मनोगत व्यक्त केले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . डॉ. सुनील जाधव यांनी सुत्र संचालन करत इन्साफ की डगर पे बचौ दिखाओ चल के गीत गाऊन विद्यार्थ्यांचा गौरव केला. पालकां सोबत संवाद साधत मेळावा संपन्न केला. आभार गजानन इंगोले सर यांनी व्यक्त केले. युनीक अकॅडमी च्या सर्व शिक्षकांनी सोहळा यशस्वीते साठी प्रयत्न केले.

# वैजापुरात पोलिसांची मोठी कारवाई कत्तलखान्यामधून केली ५८ गोवंश जनावरांची सुटका

*दै.चालु वार्ता, वैजापूर, प्रतिनिधी,*
*◀भारत पा.सोनवणे▶*

**वैजापूर :** शहरातील खान गल्ली भागात विविध ठिकाणी छापे टाकुन ही कारवाई वैजापूर उपविभागाच्या सहाय पोलिस अधिक्षक महक स्वामी यांच्या नेतृत्वाखाली पोलिस निरीक्षक संजय लोहकरे यांच्या पथकाने या कारवाईत जवळपास दोन क्विंटल जनावरांचे विक्रीसाठी ठेवलेले मांस, ५८ जनावरे असा सोळा लाख ३५ हजार ४५० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.? पोलिसांनी कारवाईतील ५८ निष्पाप जनावरांना वैद्यकिय तपासणी करुन तालुक्यातील हडसपिंपळगाव येथील रेणुका माता गोशाळेत



सुरक्षितरित्या हलवले आहे. वैजापूर शहरातील खान गल्ली भागात बेकायदा कत्तलखाने चालवले जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिस अधिक्षक मनीष कलवानिया, अप्पर पोलिस अधिक्षक सुनिल लांजेवार यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय निशा बनसोड, पोलिस उपनिरीक्षक श्रीराम काळे, गोलवाल, मोटे, पैठणकर यांच्या पथकाने खान गल्लीत वेगवेगळ्या ठिकाणी छापा टाकला असता आरोपींनी निर्दयीपणे जनावरांना डांबुन त्यांची कत्तल करत असल्याचे आढळुन आले. त्या १३ आरोपी विरुद्ध वैजापूर पोलिस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी रक्षण कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय लोहकरे हे करीत आहेत.

# अंबाजोगाईत बांधकाम विभागाचे अधिकारी हाकू लागले उंटावरून शेळ्या

## केज मतदार संघात कोट्यावधी रूपयांची विकास कामे सुरू कामाची पाहणी करायला अधिकाऱ्यांना नाही वेळ

*दै.चालु वार्ता, बीड, प्रतिनिधी,*
*◀बालाजी देशमुख▶*

**बीड/अंबाजोगाई :** येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचा कारभार रामभरोसे सुरू असून कोट्यावधी रूपयांचे विकास कामे सुरू असताना ही त्याचा दर्जा पाहण्यासाठी अधिकाऱ्यांना वेळ नसल्यामुळे निकृष्ठ दर्जाच्या कामाचा गुत्तेदारांनी सपाटा सुरूकेला आहे. पधंरा-पंधरा दिवस अधिकारी कार्यालयाकडे फिरकत नसल्यामुळे नागरिकांना कार्यालयाची दरवाजे झिझवावी लागत आहेत. या सर्व प्रकारावरून बांधकाम विभागातील अधिकारी उंटावरून शेळ्या हाकत असल्याचे निर्माण झाले आहे.

अंबाजोगाई सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आखत्यारीत असलेल्या केज-धारूर-अंबाजोगाई-परळी, स्वाराती मेडीकल आणि माजलगाव या तीन विधानसभा मतदार संघात यांच्या विभागातील आमदारांनी आपआपल्या मतदार संघाचा विकास व्हावा आनुशेष शिल्लक राहू नये लोकांच्या मागणीनुसार रस्ते, सामाजिक सभागृह, प्रशासकीय इमारती यासाठी कोट्यावधी रूपयांचा निधी मंजुर करून आणला आहे. या कामाची पाहणी करायला. अधिकाऱ्यांना वेळ नाही. मुळात अधिकारीच कार्यालयात व साईटवर येत नाहीत. त्यामुळे बोगस व दर्जाहिन कामाचा सपाटा मोठ्या प्रमाणावर सुरूआहे. केज विधानसभा मतदार संघात आ.नमिता मुंदडा यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून कोट्यावधी रूपयांचा विकास निधी मंजुर करून आणला. या निधीतून सामाजिक सभागृह, रस्ते व प्रशासकीय इमारती यांचा समावेश आहे. मोठ्या प्रमाणावर निधी मुंदडा यांनी आणल्यामुळे त्यांच्यावर जनता खुश आहे. तर मंजुर कामे सुमार दर्जाची निकृष्ठ व बोगस होत असल्याची सार्वजनिक बांधकाम विभागावर जनता नाखुश आहे. विशेषतः सिमेंट-कांक्रेटची कामे, नाली काम, संरक्षण भिंती, इमारती या कामात सिमेंट ऐवजी राख वापरली जात असल्याची चर्चा सुरू आहे. रस्ता कामात लोखंडी सळ्याचा वापर न करणे कमी जाडीच्या नाल्या बांधणे, कमी उंचीचे संरक्षण भिंती बांधणे, रस्ते कामात नदीतील गोठे, तसेच विशिष्ठ जाडीचा थर मंजुर असतानाही कमी जाडीचा थर बनविणे, डांबरी रस्त्यात डांबराऐवजी जळालेले ऑईल वापरणे असे प्रकार अंबाजोगाईच्या बांधकाम विभागात सुरू आहेत. मुळात ही सर्व कामे दर्जेदार होतील एवढा निधी आ.मुंदडा यांनी मंजुर करून आणला असतानाही केवळ 'स्वामी भक्त' गुत्तेदार पोसण्यासाठीच हा उठाठेव सुरूआहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना मुख्यालयीन न राहता घरी बसायचा पगार देण्यासाठीच शासन पैसे मोजत आहे की काय? असा प्रश्न उपस्थितीत होत आहे. बांधकाम विभागात कार्यकारी अभियंता (१), उपकार्यकारी अभियंता (६), अभियंता तीस, सह उपअभियंते आणि इतर कर्मचाऱ्यांचा वर्ग मोठ्या प्रमाणावर असताना यातील मोजकेच अधिकारी, कर्मचारी, कार्यालयात येतात. काही अधिकारी पंधरा-पंधरा दिवस गायब होतात. त्यांच्या कार्यालयाला नेहमी टाळेच लागलेले असते. लोकसेवक असतानाही हे अधिकारी फोन उचलत नाहीत. पत्र व्यवहाराला उत्तर देत नाहीत. माहिती अधिकार गुंडाळून ठेवतात. एकुणच सार्वजनिक बांधकाम विभागाचा कारभार 'राम भरोसे' सुरू आहे.



**स्वारातीचे उपविभाग नावालाच...**

ग्रामिण भागातील जनतेसाठी जिवन वाहीनी ठरलेल्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामिण शासकीय वैद्यकीय रूणालय व महाविद्यालयासाठी बांधकाम विभागाचा स्वतंत्र उपविभाग आहे. या कार्यालयात अधिकारी उपलब्ध नसतात. बाहेर गावी राहूनच कार्यालय चालविले जाते. या कार्यालयाचे प्रमुख असून अडचण नसुन खोळंबा बनले आहेत. अत्यंत निकृष्ठ दर्जाचे कामे होत असल्याच्या तक्रारी होवू नये केवळ बघ्याची भूमिका घेवून हा उपविभाग कोणतीही ठोस कारवाई करत नाही. या मागे 'अर्थ'दडला आहे.

**लातूरहून चालतो बांधकाम विभागाचा कारभार**

अंबाजोगाईतील बांधकाम विभागाचा कारभार मागील कित्येक वर्षापासुन लातूरमध्ये बसूनच चालतो त्या अधिकाऱ्यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक असतानाही कार्यकारी अभियंता व उपकार्यकारी अभियंता हे लातूरहून ये-जा करतात. कधी येतात आणि कधी जातात याची कल्पना देखील नसते. कार्यालयीन वेळेत कधीच हे अधिकारी दिसून आले नाहीत. यांच्यावर कायदेशिर कारवाई झाली पाहिजे- नितीन परदेशी, (तालुकाध्यक्ष मनसे विद्यार्थी सेना)

# भुम आगाराची बस बार्शीहुन भुमकडे येताना भांडगाव शिवारात झाली पलटी



*दै.चालु वार्ता, परंडा, प्रतिनिधी,*
*◀धनंजय गोफणे▶*

**परंडा :** भुम आगाराची परिवहन महामंडळाची बस क्र (एम एच २० बी एल २८०५) या नंबरची बस बार्शीहुन भुमकडे रवाना झाली असता भांडगाव शिवारात माळी वस्ती जवळ एसटीबस अलिकडील बाजुस खड्डा वाचवताना ड्रायव्हरच्या बाजूला बस ब्रेक फेल होऊन पलटी झाली आहे बसमध्ये एकुण ४० ते ४५ प्रवासी होते जखमींना उपचारासाठी मानकेश्वर सरकारी दवाखाना येथे प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी भुम येथील सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे तसेच जखमी प्रवासी आपापल्या सोईनुसार बार्शी भुम जवळा नि.मानकेश्वर या ठिकाणी उपचार घेत आहेत. तसेच जवळा पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक सम्राट माने पोलिस नाईक स्वामी हे घटना स्थळी दाखल झाले प्रवाश्याना मदत केली तसेच मानकेश्वर जवळा नि. भुम येथील आरोग्य विभाग अतिदक्षता विभाग यांनी अति तातडीने घटनास्थळी धाव घेऊन जखमींना उपचारासाठी दाखल करण्यात आले. प्राथमिक अंदाजानुसार बसमधील प्रवाशांची कुठली ही जीवीत हानी झालेली नाही असे समजते.

# देळुब बलात्कार प्रकरणातील आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी

## लोह्यातील सकल मराठा समाजाची मागणी




*दै.चालु वार्ता, उपसंपादक नांदेड*
*◀गोविंद पवार▶*

**लोहा :** अर्धापूर तालुक्यातील देळुब येथील मतिमंद १३ वर्षीय बालिकेवर अमाणुष रित्या लैंगिक अत्याचार झाला असुन आरोपी राहुल चांदोजी वाघमारे वय ३० याला अर्धापूर पोलिसांनी अटक केले आहे. सदरील घटना ही माणुसकीला काळीमा फासणारी असुन तात्काळ आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी. हरामखोर प्रवृत्तीच्या लोकांना वेळीच कडक शिक्षा झाली नाही तर समाजात अशाच घटना घडत राहतील त्यामुळे या आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा व्हावी अशी मागणी लोह्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने पोलिस निरीक्षक लोहा यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी विजय पाटील चव्हाण, माऊली पाटील पवार, प्रा.बाळासाहेब जाधव, नंदाजी पाटील इंगळे, भानुदास पाटील पवार, केशव पाटील पवार, निळकंठ वडजे, बालाजी नळगे, गोपाळ जाधव सह आदिंची उपस्थिती होती.

# उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर वेंजने यांची सावळी सदोबा पोलीस चौकीला भेट

## (परीसरातील नागरिकांच्या समस्या घेतल्या जाणून)

*दै.चालु वार्ता, आर्णी, प्रतिनिधी,*
*◀रमेश राठोड▶*

**आर्णी :** आर्णी तालुक्यातील येत असलेल्या सावळी सदोबा- पारवा पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या सावळी सदोबा पोलीस चौकीला उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी प्रथमच भेट दिली असुन, सावळी सदोबा येथील पत्रकार संघटनेच्या वतीने व पोलीस पाटील संघटनेच्या वतीने उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले, सावळी सदोबा परिसरातील पत्रकार जेष्ठ नागरिक, तथा पोलीस पाटील यांच्याशी चर्चा करून, जातीय सलोखा कायम ठेवण्याचे आव्हाण करण्यात आले, परिसरातील दारू, मटका, जुगार, यासंदर्भात काही तक्रारी असेल तर मी संकोचपणे मांडा, तुमच्या सूचनेचे पालन करण्यात येईल आणि त्या करिता मी उपायोजना करण्यात तयार आहे, परिसरातील गुन्हेगारी विषयीकाही कोणाकडून काही सूचना असेल तर दिलखुलासपणे सांगा, सावळी सदोबा



परिसरातील बहुतांश गावातील पोलीस पाटलाचे पदे रिक्त असल्याचे पोलीस पाटील संघटनेकडून सांगण्यात आले, एका पोलीस पाटलाकडे चार-चार गावाचा पदभार असल्याने नागरिकांना वेळ देता येत नाही, अशा प्रतिक्रिया पोलीस पाटील संघटनेकडून व्यक्त करण्यात आल्या, परिसरामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असल्याने याकरिता सामाजिक सलोखा ठेवून समन्वयाने वाद-विवाद निपटारी लागावे, असे मत विभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर वेंजने यांनी व्यक्त केले, यावेळी उपस्थित पत्रकार सुरेश राठोड, मोहम्मद सर्वे, राम पवार, अविनाश चव्हाण, अमीन चव्हाण, जेबी पठाण, पापलू सर्वे, दुर्गेश कर्णेवार,सह पत्रकार संघटनेचे पदाधिकारी तथा मुबारक तंवर,प्रकाश राठोड,मोहण चव्हाणसह नागरिक उपस्थित होते यावेळी पारवा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विनोद चव्हाण, सावळी सदोबा दूरक्षेत्राचे गजानन गजभारे हेमंत राठोड शामसुंदर रायके, सह पोलीस विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

# बार्टी कडून छत्रपती राजश्री शाहू महाराज यांची जयंती साजरी

*दै.चालु वार्ता*
*◀वसमत, प्रतिनिधी▶*

**वसमत :** राजश्री शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था प्रकल्पाधिकारी सिद्धार्थ गोंवदे यांच्या मार्गदर्शनाखाली समतादूत मिलिंद आळणे, गुरुनाथ गाडेकर यांनी जिल्हा परिषद माध्यमिक शाळा वसमत कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्रीमती कांचन पतंगे मॅडम हे होत्या. आपल्या कृतिशील कार्यातून सामाजिक समता प्रस्थापित करणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची आज जयंती. शाहू महाराजांनी केलेल्या सुधारणा काळाच्या पुढच्या होत्या. जात-पात-धर्म अशा गोष्टी माणसांच्या प्रगतीच्या आड येऊ नये ही त्यांची भूमिका होती. ते खऱ्या अर्थाने 'लोकांचे राजे' होते. त्यांचे विचार आणि कार्य आजही मार्गदर्शक आहे. राजर्षी शाहू महाराज यांचा जन्मदिवस शासनाच्या वतीने 'सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना कृतज्ञतापूर्वक अभिवादन. यावेळी श्रीमती देशमुख अनुराधा, मॅडम कांबळे सर ,अंबरखाने सर, मुजीब सर मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते आभार प्रदर्शन दवणे सर यांनी केले.

# श्री संत शंकरस्वामी महाराज पायी दिंडी वारकरी व ग्रामस्तांचे वरकटणे येथे श्रमदान

*दै.चालु वार्ता, वैजापूर, प्रतिनिधी,*
*◀भारत पा.सोनवणे▶*

**वैजापूर :** श्री संत शंकर स्वामी महाराज यांनी शके १७११ ला श्री क्षेत्र शिऊर ते श्री क्षेत्र पंढरपूर या ठिकाणी पायी दिंडी सोहळ्यामध्ये जात असतांना मौजे वरकटणे' ता. करमाळा या गावी वाड्यामध्ये स्वामींनी मुक्काम केला होता वाड्यात सर्पाला बोलविले व पंढरपूर येथे त्याला समाधी दिली. त्या जागेचा जिर्णोध्दार व्हावा म्हणुन 'श्री संत शंकर स्वामी महाराज समाधी संस्थान श्री क्षेत्र शिऊर ता. वैजापूर, जि.छ.संभाजीनगर व मौजे वरकटणे ग्रामस्थ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रयत्न होत असुन त्या जागेचा लवकर विकास व्हावा म्हणून ही संतसेवा करून्या श्री ह भ प सारंगधर



महाराज भोपळे व ह भ प रामभाऊ महाराज मगर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र पंढरपूर येथे दिंडी जात असतांना संस्थानचे कार्याध्यक्ष पोपटराव जाधव, विश्वस्त शिवाजी साळुंके व अनेक वारकरी भाविकांनी या वेळी श्रमदान केले तसेच वरकटणे ग्रामस्थ यांनी परिश्रम घेतले.

# बेघर भाडोत्री सभासदाच्या मागणी साठी रयत दलित स्वयंसेवक संघ काढणार जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

*दै.चालु वार्ता, अहमदपूर, प्रतिनिधी,*
*◀विष्णू मोहन पोले▶*

**लातूर :** दिनांक २८ जुन रोजी दुपारी १२ ते ५ वाजता शिवाजी चौक ते ५ नंबर चौक लातूर ते लातुर जिल्हाधिकारी कार्यालय इथ पर्यंत भाडोत्री सभासदाच्या मागणी साठी विराट मोर्चा निघणार आहे. सविस्तर बातमी अशी की, रयत दलित स्वयंसेवक संघाच्या वतीने दोन वर्षांपासून जिल्हाधिकारी कार्यालयाला लातुर शहरातील बेघर भाडोत्री सभासदांना सरकारी मोकळ्या जागेत हक्काचे घर बांधून राहण्याच्या संदर्भात ३३×३३ एक गुंठा जमीन प्रत्येक सभासदांना भाडे पट्याने देण्यासाठी



ह्या विराट मोर्चाच आयोजन केल आहे तरी सर्व जनतेने या मोर्चात सामील होण्यासाठी चे अवाहन दलित रयत स्वयं सेवक संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

(पान १ वरुन...☞)

## ज्येष्ठ सिने नाट्य अभिनेत्री आशाताई काळे...

कोणतीही नशा सुटेल मात्र रंगमंचांची आणि टाळ्यांची नशा न सुटणारी' असे सांगत आशाताईंनी आपल्या कारकीर्दीतील अनेक आठवणींना उजाळा दिला. मेघराज राजेभोसले म्हणाले, 'बालगंधर्व रंगमंदीर हे एकमेव नाट्यगृह आहे, ज्याचा वर्धापन दिन सर्व कलाकार मिळून साजरा करतात. मात्र केवळ वर्धापन साजरा करणं हा आमचा उद्देश नाही. तर नाट्यगृह जगली पाहिजेत ही यामागाची भूमिका आहे.' साक्षात पु.ल.देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली या बालगंधर्व रंगमंदिराची उभारणी झाली होती. या वर्धापन दिनानिमित्त मेघराज राजेभोसले मागील अनेक वर्षांपासून रंगभूमीवरील उतुंग व्यक्तींचा सन्मान करत आहेत. यावेळी आमदार रवींद्र धंगेकर, कवयत्री प्रतिभाताई मोडक आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. तर अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड हिने मानपत्राचे वाचन केले. तसेच पराग चौधरी व शोभा कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

# दै. बुलंद शक्ती मुख्य संपादक रामेश्वर दरेकर यांनी दुसऱ्या वर्षीही झाडांची रोपे देऊन राबवला सामाजिक उपक्रम


**दै.चालु वार्ता, मंठा, प्रतिनिधी,**
**◀सुरेश ज्ञा. दवणे▶**

**मंठा :** मंठा तालुक्यातील वझर सरकटे येथील कै.शिवाजी परसराम दरेकर यांच्या व्दितीय पुण्यतिथीनिमित्त दै.बुलंद शक्ती मुख्य संपादक रामेश्वर शिवाजी दरेकर यांनी गावात प्रत्येक घरोघरी झाडांची रोपे देऊन 'एक व्यक्ती, एक वृक्ष' लागवड व संवर्धनाचा संकल्पाचे दुसऱ्या वर्षीही आगळावेगळा सामाजिक उपक्रम राबविला. विषेश म्हणजे, प्रथम पुण्यतिथीनिमित्त लावगड केलेल्या झाडांची झालेली वाढीबद्दल समाधान व्यक्त केले. वडिलांच्या हयातीत देखील रामेश्वर शिवाजी दरेकर हे वृक्षारोपण दरवर्षी नित्य नियमाने करत होते वडिलांच्या निधनानंतर देखील यात खंड पडू दिला नाही अनेक जातीचे वटवृक्ष उंच उंच वाढली आहे. झाडाबाबतीत असलेले प्रेम हे गावकऱ्यांसाठी कुतूहलाचा विषय ठरला आहे.

वृक्षवल्ली आम्हा सोयरसोयरे वनचरे
पक्षीही सुस्वरे। आळविती।।
येणे सुख रुचे एकांताचा वास।
नाही गुणदोष। अंगी येत।।

पर्यावरणाचे संतुलन ठेवण्यासाठी आणि पर्यावरणाला प्रदूषणापासून वाचण्यासाठी झाडे महत्त्वाची भूमिका बजावतात. म्हणून प्रत्येकांनी जर वृक्षरोपण करण्याबरोबरच वृक्षांचे योग्य पालनपोषण केले तर त्यांच्यापासून आपल्याला विविध गोष्टी प्राप्त होतात. ज्या भागांमध्ये वृक्षाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असते त्या भागातील परिसर हा स्वच्छ आणि निसर्गमय पाहायला मिळतो, असे मत दै. बुलंद शक्ती संपादक रामेश्वर शिवाजी दरेकर यांनी व्यक्त केले.

कै.शिवाजी दरेकर यांच्या सामाजिक कार्याचा वसा आणि विचार रामेश्वर दरेकर जपत असून व्दितीय पुण्यतिथी निमीत्ताने लिंबूनी, कढीपत्ता, सिताफळ, मोगरा, पेरु, वड पिंपळ इत्यादी वटवृक्षाची झाडे वझर सरकटे येथे वाटप करण्यात आले. वडिलांच्या निधनानंतर वडिलांची आठवण वटवृक्षाचे संगोपन करुन पर्यावरण समतोल अबाधित ठेवून जपावी पशुपक्षी देखील वटवृक्ष असतील तर यांची लोकसंख्या वाढु शकते अन्यथा पक्षुपक्षी देखील कालबाह्य होतील. उन्हापासुन सुरक्षा झाडापासून मिळते, पाऊस देखील झाडामुळे पडतो, शुद्ध हवा आपल्याला या झाडामुळे मिळते शुध्द हवेचे महत्त्व कोरोनात निधन झालेल्या लोकांना माहित आहे यामुळे जगण्यासाठी हवा अत्यंत उपयुक्त आहे या साठी वटवृक्ष जगवणे यांची निगा राखणे हे गरजेचे आहे असे मत रामेश्वर शिवाजी दरेकर यांनी वयक्त केले. यावेळी आदींसह अनेकांची उपस्थिती होती.



**प्रसिद्ध देवस्थान जय धनेशवर मौजे वझर सरकटे येथे कै. शिवाजी परसराम दरेकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त वटवृक्ष वाटप करताना गावातील नागरिक नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## हे तुम्हाला माहिती आहे का?

### जगातील सर्वात मोठा देश कोणता आहे ?

संपूर्ण जगात १८० पेक्षा अधिक देश आहेत, यातील काही विकसित देश आहेत, तर काही विकसनशील. या व्यतिरिक्तही प्रत्येक देशाचे काही ना काही वैशिष्ट्य आहे, मग ते वैशिष्ट्य नैसर्गिक असो, वा मानवनिर्मित. असेच एक वैशिष्ट्य म्हणजे क्षेत्रफळ. ह्या लेखात आपण अशा देशाची माहिती पाहणार आहोत, जो क्षेत्रफळाच्या दृष्टीकोनातून संपूर्ण जगात सर्वात मोठा आहे. रशिया हा क्षेत्रफळाच्या दृष्टिकोनातून जगातील सर्वात मोठा देश असून, रशियाचे एकूण क्षेत्रफळ १७,००,००० किलोमीटर वर्ग इतके आहे. इतर देशांच्या तुलनेत रशियाच्या सीमा अधिक विस्तारले आहेत. १,४९,००,००० लोकसंख्या असलेला रशिया हा देश सर्वाधिक लोकसंख्या असणाऱ्या देशांच्या यादीत ९ व्या क्रमांकावर येतो. या देशात एकूण ११ विविध टाइम झोन आहेत. रशियातील मॉस्को शहर हे न केवळ युरोप मधील सर्वात मोठे शहर आहे, तर सोबतच रशियाची राजधानी देखील आहे. रशियामध्ये स्लॅविक भाषेचा अधिक वापर केला जातो. रशियाचा विस्तार इतका आहे की, रशिया देश हा आशिया आणि युरोप अशा दोन खंडांचा भाग आहे. थोडक्यात सांगायचे तर रशिया हा एक आंतरखंडीय देश आहे. रशियाच्या सीमा ह्या मंगोलिया, पोलांड, युक्रेन, बेलारुस, लाटविया, नोर्वे, इंग्लंड, मंगोलिया, उत्तर कोरिया, कजाकिस्तान अशा काही देशांसोबत जोडल्या गेल्या आहेत. रशियाच्या दक्षिण भागात नऊ महत्त्वपूर्ण अशा पर्वतरांगा आहेत, या पर्वतरांगामध्ये काकेशस नावाच्या पर्वतांचा एक भाग आहे, ज्याला रशियात विशेष महत्त्व दिले जाते. रशियाच्या पूर्वेकडील कामचटका नामक द्वीपकल्पात कळयुचेवसकाय सोपक नामक ज्वालामुखी अस्तित्वात आहे, ही युरोप आणि आशिया खंडातील सर्वात सक्रिय अशी ज्वालामुखी मानली जाते, या ज्वालामुखीची एकूण उंची ४,७५० मीटर म्हणजेच १५,५८४ फूट इतकी आहे. रशियातील उरल पर्वतरांग ही खनिज संपत्तीने किंवा संसाधनांनी परिपूर्ण मानली जाते, तसेच ही पर्वतरांग आशिया खंड आणि युरोप खंड, या दरम्यान सीमेचे कार्य देखील करते. रशियाची अधिक तर सिमा ही समुद्रासोबत सोबत जोडली गेली आहे. सखालिन, न्यू सायबेरियन बेट, फ्रान्स जोसेफ, नोवाया झेमल्या हे काही रशियातील प्रमुख बेट आहेत. रशिया देशात एक लाखांपेक्षा अधिक नद्या अस्तित्वात आहेत. रशियातील बैलक हे संपूर्ण पृथ्वीवर सर्वात जुने, आकाराने मोठे, शुद्ध आणि खोल असे तलाव आहे. व्होल्गा ही युरोप खंडातील सर्वात लांब नदी आहे, तसेच रशियाची राष्ट्रीय नदी देखील आहे. रशिया हा देश स्थापन होण्याआधी पासूनच रशियातील भूभागावर लोकांचा सहवास होता. रशिया देशाच्या स्थापनेची खरी सुरुवात ही ८६२ मध्ये झाली होती, कारण याच दरम्यान रूसचा रुरिक याने रशियातील पहिल्या आधुनिक राज्याची स्थापना केली होती. या घटनेच्या काही वर्षांनंतर रूस द्वारे कीव नामक शहरावर विजय मिळवण्यात आला आणि तेथे किवन रूस चे राज्य स्थापित करण्यात आले. दहाव्या आणि अकराव्या शतकापर्यंत कीवन रूस हे आजच्या युरोप खंडातील, तेव्हाचे सर्वात प्रभावी आणि शक्तिशाली असे साम्राज्य बनले होते. तेराव्या शतकात च्या दरम्यान मंगो लोने जीवन रोज राज्यावर हल्ला करून तेथे स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित केले आणि किंवा नुसते वर्चस्व संपुष्टात आणले. १४ वे शतक येता येता मॉस्को चे ग्रँड डची हे सत्तेत आले, जे नंतर रोमन साम्राज्याचे मुख्य बनले. ग्रँड डची यांनी १५४७ दरम्यान रशियाचा पहिला झार घातला. रशियातील जनतेद्वारे ग्रँड डची ला तिसरा रोम नावाने संबोधले गेले. सोळाव्या शतकात मिखाईल ने रोमानेव्ह नामक राजवंशाची स्थापना केली, या वंशातील लोकांनी अनेक वर्षे रशियावर राज्य केले. १६८९ ते १७२५ च्या दरम्यान पीटर द ग्रेट ह्यांनी रूस साम्राज्याचा विस्तार केला, कालांतराने रूस संपूर्ण युरोप मधील एक मुख्य शक्ती केंद्र बनले होते.

१९ व्या शतकात जेव्हा रशियन संस्कृती शिगेला पोहोचली होती, त्यावेळी येथील अनेक कलाकार आणि लेखक संपूर्ण जगभरात प्रसिद्ध झाले होते. पहिल्या विश्वयुद्ध दरम्यान रशियातील जनतेने झार राजवटीला विरोध केला व त्याविरुध्द लढा देखील दिला. व्लादिमीर लेनिन ह्यांनी झारच्या राजवटीविरोधात बोल्शेविक या राजकीय पक्षाचे नेतृत्व केले.









## श्री संत नामदेव पाठ
### पुष्प १६ वे

नाही कर्तव्य कळत । हातभाजल्याच्या विना । ।
मळवितो अजुनि हातपाय । खेळण्याविना हा राहिना ।।
देवुनि मुळ बोलवावे । राजाईच्या मातपित्याला ।।
वर हा उपवर झाला । हाती घ्यावे आनंद कार्याला ।।
– आनंद

**अर्थ :–** गोणाई माता दामाजींस म्हणतात नामदेवावर आता जवाबदारी टाकायला पाहिजे म्हणून त्यांच्या लग्नाचा विचार करायला पाहिजे .


त्या शिवाय याचा खेळकरपणा जाणार नाही .

आपल्या नात्यातली राजाई सुंदर व सुशील मुलगी आहे तिच्या आई वडिलांस बोलावून घ्यावे .

मुलगा उपवर झाला आहे लवकरच घरात शुभकार्य घडायला पाहिजे आनंदी आनंद झाला पाहिजे .

**– ह भ प आनंद महाराज काकडे**

## शब्दकोडे 31




**आडवी विधाने:–** 1) तह, प्रेमाची बोलणी 3) सुरुवातीचे, प्रारंभ 5) कंबरेभोवती बांधण्याचा गोफ 8) महादेवाला वाहण्यात येणारे त्रिदळी पान 10) वस्त्राचे छिद्र बुजविण्याकरिता त्यात विणलेले दोरे 11) पडणे, नाश होणे 13) प्रतिशोध 14) किंचित काळ्या रंगाचे असलेले 16) धर्माने न वागणारा, अनाचारी 17) गाभारा, आतील भाग 18) हार, जिंकणे 19) स्वभावसिद्ध, नैसर्गिक 21) तालासुरात म्हटलेले गीत 22) कापड विणणारा 24) विस्मृती, विसर 25) स्वर्गलोकीची एक अप्सरा 26) सौदामिनी, विद्युल्लता 27) रात्री विचरण करणारा, चंद्र 30) शास्त्रीय गायनातील स्वरयुक्त विशिष्ट शैली 32) प्रहर 34) रामायणात राम सेतुचे निर्माण करणारा श्रीरामाच्या वानरसेनेतील एक मुख्य सेनापती 35) सारखे, तूल्य 37) ढवळाढवळ, हस्तक्षेप 38) नवस फेडण्यासाठी देवाजवळ ठेवलेली वस्तू 39) सदोदित हसतमुख राहणारा 41) बाण, तीर 42) लहान व बंदिस्त खोली 44) कमी करणे, काढून टाकणे 45) वडिलांच्या सासूच्या मुलाची बायको 46) आयुष्याची होऊन गेलेली एकंदर वर्षे 47) जिव्हामूलावर लोंबणारा एक मांसपिंड 49) पैसा, द्रव्य, संपत्ती 50) रोजकीर्दीतील पक्क्या रकमा खातेनिहाय लिहिणे 52) शीर, स्नायू 54) तलवार 57) धेनु 59) पौर्णिमा 60) चेष्टा, उपहास 61) सुंदर स्त्री 62) केवळ एकच 63) टवाळखोर 64) कोणत्याही परिस्थितीत कष्टाची कामे करू शकणारा

**उभी विधाने:–** 1) लिंबू, साखर व सुगंधी द्रव्य पाण्यात घालून तयार केलेले पेय 2) चटका बसणे, नुकसान होणे 4) लग्नानंतरच्या पहिल्या दिवाळीसाठी जावई व त्याच्या घरची मंडळी बोलावून त्यांचे आगत स्वागत व मानपान करणे 5) पाप, अधर्म 6) निमग्न, लीन 7) एक सम संख्या 9) जलद, त्वरित 12) चंद्र, चंद्रमा 15) मुलींचा घागरा 16) न विसरता येण्यासारखे 20) भक्त, निष्ठावंत, श्रद्धायुक्त 21) देवळाच्या आतील भाग, गर्भगृह 22) दसरा 23) रात्र, निशा 28) समुद्रमंथनातून निघालेले हलाहल प्राशन केल्याने शिवशंकराचे पडलेले नाव 29) चकाकी, उसण, वेदना 31) स्त्रियांनी केसांत माळण्याची फुलांची लांब वेणी 33) जाळयांच्या सुशोभित ताट्या लावून केलेली जागा 35) विचार विनिमयासाठी जमलेली मंडळी, बैठक 36) प्राणोत्क्रमण, निधन 40) हिंदीत शिक्षा 42) विळा 43) शिवशंकराचे नृत्य, थयथयाट 45) एखाद्याला आपला मुलगा मानणे, इच्छामात्रेकरुन निर्माण केलेला पुत्र 46) नांगरलेली जमीन साफ करण्याचे एक साधन 48) भीती 51) प्रौढ, वय झालेला 53) सातचा समुदाय 55) हृदय, अंतःकरण, सुख दुःख जाणणारे इंद्रिय 56) अंत, समाप्ती 58) साहित्यातील एक शब्दालंकार 61) पुन्हा पुन्हा तेच ते बोलणे (उत्तर पुढील अंकी)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रा | न | वा | | सिं | ह | | ला | | ज | वा | न | | उ |
| ज | ग | त | | हा | ल | | व | र | मा | य | | रा | धा |
| पू | र | | पा | व | | पु | ण्य | वा | न | | पों | | र |
| त | | अ | व | लो | क | न | | ना | त | ल | ग | | |
| | | ज | न | क | | विं | | | | क | ल | दा | र |
| न | व | रा | | न | रो | वा | कुं | ज | रो | वा | | नी | |
| व | | म | स | | म | ह | ती | | म | | सा | | म |
| नी | | र | म | ण | | | | अ | ह | म | ह | मि | का |
| त | न | | ज | | | प | | ह | र्ष | | स | र | |
| | र | | दा | | र | थ | | वा | क | डा | | गी | त |
| | क | स | र | त | | क | मा | ल | | ल | क | | मा |
| आ | पा | दा | | व | ज | | | | ख | डा | ष्ट | क | |
| क | ल | र | व | | प | रि | च | र | | | सा | ल | स |
| र्ण | | त | ग | र | | | र्म | | अ | सा | ध्य | | म |

Uday Munde - 8446302691



**ओळखा पाहू मी कोण ?**

- दिवसागणिक पुढे सरकतो महिन्यातून थोडा बदलतो मी सण, वार, सुट्ट्या आणि बरंच काही तुम्हाला दाखवत राहतो मी, ओळखा पाहू मी कोण ?
- ☞ उत्तर : ???
- (दि : २५ जून) कधी भिंतीवर, कधी हातावर दिमाखात बसतो मी, अहोरात्र करतो मी वेळ दाखवण्याचं प्रामाणिक काम, ओळखा पाहू मी कोण ?
- ☞ उत्तर : घड्याळ

टीप : ह्या कोड्याचं उत्तर उद्याच्या अंकात येल, तुम्हाला माहिती असेल तर कृपया आम्हाला वॉट्सअप करा :९४२०२६६८७४

## नोकरी विषयक



**दै.चालु वार्ता, वृत्तसेवा**

### एकात्मिक बाल विकास सेवा योजना विभागात विविध पदाच्या ४० जागा

एकात्मिक बाल विकास सेवा योजना विभाग, जळगाव यांच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण ४० जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्रताधारक असणाऱ्या उमेदवारांकडून विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत.

**विविध पदांच्या एकूण ४० जागा**

अंगणवाडी मदतनीस पदांच्या जागा

शैक्षणिक पात्रता – पदांनुसार सविस्तर शैक्षणिक पात्रतेकारिता कृपया मूळ जाहिरात पाहावी.

**अर्ज करण्याचा पत्ता –एकात्मिक बाल विकास सेवा योजना पंचायत समिती घनसावंगी या कार्यालयात**

अधिकृत वेबसाईट : **https://jalna.gov.in/**

टीप : ऑनलाईन माहिती आधारे ही जाहिरात लावली आहे. आम्ही कोणत्याही प्रकारची पुष्टी अथवा हमी देत नाही.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 8 | | | 9 | | |
| | 9 | | | 7 | | | | 4 |
| | 8 | 4 | | | | | 6 | |
| | | | 4 | 1 | | 2 | | |
| | | 3 | | | | 5 | | |
| | | 1 | | 6 | 9 | | | |
| | 2 | | | | | 7 | 4 | |
| 9 | | | | 2 | | | 3 | |
| | | 7 | | | 6 | | | |

## सुडोको

आपले थोडे डोके वापरा आणि करा नंबरची अदला बदल. जेवढ या लवकर आपण हे कोडे सोडवताल तेवढे आपल्याला हुषार समजण्यात येईल.

**खेळाचे नियम :–** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतू ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे.

प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे. या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

**मागील अंक सुडोको चे उत्तर ....**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 5 | 7 | 2 | 4 | 8 | 1 | 6 | 9 |
| 8 | 4 | 9 | 6 | 5 | 1 | 2 | 3 | 7 |
| 6 | 2 | 1 | 7 | 3 | 9 | 5 | 4 | 8 |
| 7 | 9 | 3 | 5 | 1 | 6 | 8 | 2 | 4 |
| 5 | 6 | 4 | 8 | 9 | 2 | 3 | 7 | 1 |
| 2 | 1 | 8 | 3 | 7 | 4 | 9 | 5 | 6 |
| 1 | 8 | 5 | 4 | 6 | 3 | 7 | 9 | 2 |
| 9 | 7 | 6 | 1 | 2 | 5 | 4 | 8 | 3 |
| 4 | 3 | 2 | 9 | 8 | 7 | 6 | 1 | 5 |

## आजचे राशि भविष्य

**मेष :** आज तुम्ही ऊर्जेने भरपूर असाल - तुम्ही जे काही कराल त्यासाठी तुम्हाला नेहमीपेक्षा निम्माच वेळ लागेल.

**वृषभ :** इतरांच्या उपयुक्त ठरत असेल तर मदत करणे हेच संयुक्तिक आहे नाहीतर नश्वर देहाचा उपयोग तो काय ही बाब लक्षात ठेवा.

**मिथुन :** धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे.

**कर्क :** तुमच्या विचारांवर ज्यांचा असाधारण प्रभाव आहे अशा विशेष व्यक्तीची ओळख मित्रामुळे होऊ शकते.

**सिंह :** आज तुम्ही एकदम शांततेत राहाल आणि मौजमजा करण्याचा तुमचा मूड बनेल.

**कन्या :** तुमच्या सर्व अडचणी, समस्यांवर हसत हसत मात करणे हाच उत्तम उपाय ठरतो.

**तुळ :** तुमच्या उत्तम स्वास्थ्य सोबत आज तुम्ही आपल्या मित्रांसोबत खेळण्याचा प्लॅन बनवू शकतात.

**वृश्चिक :** स्वतःच स्वतःवर औषधोपचार करूनका, त्यामुळे औषधावर विसंबण्याची सवय वाढू शकेल.

**धनु :** तुम्ही संपूर्ण आराम करायला हवा अन्यथा थकव्यामुळे तुमच्या निराशावादी दृष्टिकोन कार्यरत होऊ शकतो.

**मकर :** आजच्या दिवशी तुम्ही आराम करु शकाल. शरीराला तेलाने मसाज करुन तुमचे स्नायू मोकळे करा.

**कुंभ :** तुमच्याकडे प्रचंड प्रमाणात ऊर्जा आहे - परंतु कामाच्या ताणामुळे तुम्ही त्रासून जाल.

**मीन :** योगासने आणि ध्यानधारणा यामुळे तुमच्या शरीराला आकार मिळेल आणि मानसिकदृष्ट्या तुम्ही सक्षम राहाल.

(पान १ वरुन...☞) **विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी राज्यातील सर्व शाळा....**

हे प्रशिक्षण राज्यस्तरावर कशा पद्धतीने सुरू आहे, त्यामध्ये किती शिक्षकांचा सहभाग होता तसेच विद्यार्थ्यांचेही यामध्ये प्रशिक्षण झाले का, याबाबतचा अहवाल सादर करण्याची सूचना करण्यात आली. या प्रशिक्षणाच्या अनुषंगाने नियमावली तयार करण्यात यावी. या बैठकीला शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव प्रताप लुबाळ, उपसचिव टि.बा.करपाते, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे उपसचिव हे.सु.पाठक, संचालक तंत्र शिक्षण डॉ.विनोद मोहितकर, शिक्षण आयुक्त कार्यालयाचे राजेश कंकाळ, राज्य शिक्षण व संशोधन परिषदेच्या मनीषा पवार, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी सोनाली परब आदी उपस्थित होते. उपसभापती कार्यालयाचे खाजगी सचिव रविंद्र खेबुडकर यांनी आभार प्रदर्शन केले.

This Daily Printed, Published and Owned by **Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** Printed at Girish Printers and Paper Converters, 150, Shaniwar Peth, Near Amruteshwar Mandir, Pune (M.S.)-411030 and Published at Flat No.806, 8 th Floor, Ratan Neptune, Handewadi Road, Hadapsar, Pune (M.S.)-411028 ■ **Editor : Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** ■ Mob No.: **9373504748** ■ Email **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक **श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** यांनी गिरीष प्रिंटर्स अँड कन्व्हर्टर्स, १५०, शनिवार पेठ, अमृतेश्वर मंदिराजवळ, पुणे (महाराष्ट्र)- ४११०३० येथे छापून फ्लॅट नं.८०६, ८ वा मजला, रतन नेपच्युन, हंडेवाडी रोड, हडपसर, पुणे (महाराष्ट्र)-४११०२८ येथून प्रकाशित केले. ■ **संपादक - श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** ■ मो.नं.**9373504748** ■ Email - **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895

ऑनलाईन पेपर वाचण्यासाठी : epaper.dainikchaluwartha.com ऑनलाईन पोर्टल बातम्या : www.dainikchaluwartha.com

दैनिक चालु वार्ता

एक पाऊल सत्याच्या शोधात!
साथ तुमची! काम आमचं!

डिजिटल न्यूज




# वाघोलीतील बेला व्हिटा सोसायटीत ड्रेनेजचे पाणी,
## आरोग्याच्या प्रश्नांनी सोसायटीधारक हैराण

*दै.चालु वार्ता, वाघोली, प्रतिनिधी,*
*◀स्वरूप गिरमकर▶*

**वाघोली :** येथील प्रियांकानगरी परिसरातील बेला व्हिटा सोसायटीत ड्रेनेजचे पाणी साचत असल्याने सोसायटी धारकांचे हाल होत आहे. पावसामुळे या पाण्यात अधिक भर पडत आहे. आता सोसायटी धारकांच्या आरोग्याचे प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. वर्षभरात सोसायटी धारकांनी अनेक तक्रार करूनही त्याची दखल महापालिका घेत नाही. असे सोसायटी धारकांनी सांगितले. सोसायटी परिसरातून सार्वजनिक ड्रेनेज वाहिनी गेलेली आहे. त्याचे पाणी रेन हार्वेस्टिंग केलेल्या सोसायटीच्या टाकीत जात आहे. या टाकीच्या बाजूलाच पिण्याच्या पाण्याची टाकी आहे. ते पाणी या पिण्याच्या पाण्यात पाझरत असल्याने सोसायटी धारकांचा आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ लागला आहे. याबाबत सोसायटी धारकांनी महापालिका, वडगाव शेरी क्षेत्रीय कार्यालय, वाघोली कार्यालय सर्व ठिकाणी तक्रार केली. महापालिका कर्मचारी पाहणी करून गेले. मात्र त्यानंतर काहीच कार्यवाही झाली नाही. कर्मचाऱ्यांनी ड्रेनेजचे झाकण उघडून पाहिले. ते झाकनही उघडलेल्या त्याच स्थितीत आहे. या परिसरात डासांचे प्रमाण वाढले आहे. सोसायटी धारक डेंगू, मलेरियाने आजारी पडत आहे. मात्र महापालिका लक्ष देत नसल्याचे सोसायटी धारकांचे म्हणणे



आहे. ड्रेनेज पाण्यामुळे सोसायटी धारकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. तक्रार करूनही महापालिकेने कार्यवाही केलेली नाही. – संतोष कडलग, सोसायटीधारक त्या सोसायटी पर्यंत ड्रेनेजचे काम झाले आहे. पुढे त्या वाहिनीचे काम करायचे आहे. त्याचा निधीही मंजूर आहे. सोसायटी धारकांशी चर्चा करून पुढे वाहिनीचे काम पूर्ण केले जाईल.

# मंत्री भुमरेंच्या विरोधात तक्रार देणाऱ्या तरुणाच्या घरावर हल्ल्याचा प्रयत्न केल्याचा आरोप

*दै.चालु वार्ता, पैठण, प्रतिनिधी,*
*◀गजानन ठोके▶*

**पैठण :** राज्याचे रोहयो मंत्री तथा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संदीपान भुमरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी पोलिसात तक्रार देणाऱ्या तरुणाच्या घरावर हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप संबंधित तरुणाने केला आहे. भाऊसाहेब वाघ असे या तरुणाचे नाव आहे. गेल्या आठवड्यात भुमरे यांनी या तरुणाला फोनवरुन शिवीगाळ केल्याची कथित ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाली होती. त्यानंतर वाघ यांनी भुमरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी करत पोलिसात तक्रार दिली होती. दरम्यान आता आपल्या घरावर हल्ल्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप वाघ याने केला असून, या प्रकरणी शहरातील पुंडलिक नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसात दिलेल्या तक्रारीत वाघ यांनी म्हटले आहे की, '२५ जूनला रात्री काळ्या गाडीतून काही लोक माझ्या घरासमोर येऊन त्यांनी दार वाजवले. या लोकांना पाहून मी तात्काळ ११२ नंबरला फोन लावला. त्यामुळे हल्ला करण्यासाठी आलेले लोक पळून गेले.' दरम्यान वाघ यांच्या तक्रारीनंतर छत्रपती संभाजीनगर शहर पोलिसांनी पुंडलिकनगर पोलिसात या प्रकरणी अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

**काय आहे प्रकरण?**


संदीपान भुमरे यांच्या पैठण मतदारसंघातील दरकवाडी गावात बाबासाहेब वाघ नावाचा तरुण राहतो. काही दिवसांपासून छत्रपती संभाजीनगर शहरात राहण्यासाठी आला आहे. दरम्यान काही दिवसांपूर्वी त्याच्या गावात रस्त्याचे काम सुरु झाले. पण रस्ता न करताच पैसे उचलण्यात आल्याचा आरोप वाघ याने केला आहे. तर हे काम मंत्री संदीपान भुमरे यांचे पुत्र विलास भुमरे यांचे असल्याचे गावातील लोकांनी सांगितल्याने आपण भुमरे यांच्या मालपाणी नावाच्या पीए यांना फोन करुन कामाबद्दल विचारणा केली होती, असं वाघ यांचे म्हणणे आहे. दरम्यान, याचाच राग आल्याने भुमरे यांनी आपल्याला फोनवरुन शिवीगाळ केली, तसेच तुझ्या घरी येतो, असे म्हणाले. त्यामुळे आपण प्रचंड दहशतीत असल्याचा आरोप या तरुणाने केला होता. तर भुमरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी करत त्याने पोलिसात तक्रार देखील दिली होती.

**दानवे यांची प्रतिक्रिया...**

दरम्यान या सर्व प्रकरणावर बोलताना विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की, कार्यकर्ते फोन करत असतात, रागवत असतात. त्यामुळे काम करत असताना आपण थोडं संयम बाळगला पाहिजे. कोणीतरी आरोप केले म्हणून लगेच आपण उत्तर द्यावे, शिवीगाळ करावे हे चुकीचे असल्याचे दानवे म्हणाले आहेत.

# बहुजनाचे लोककल्याणकारी राजे छत्रपती शाहूमहाराज

*दै.चालु वार्ता,*
*अहमदपूर, प्रतिनिधी,*
*◀हाणमंत सोमवारे▶*



**अहमदपूर :** जयंती विशेषांक, आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक व सामाजिक आर्थिक कार्याच्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांची सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडून आणणारे, प्रजाहितदक्ष, सत्ताधीश म्हणजे राजश्री छत्रपती शाहू महाराज होत. त्यांच्या कार्यामुळेच त्यांचे व्यक्तिमत्व केवळ कोल्हापूर संस्थाना पुरते मर्यादित न राहता, महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात ही लोकप्रिय झाले. एक आदर्श राजा बहुजन समाजाचा नेता म्हणून असलेली त्यांची लोकप्रियता शेवटपर्यंत कायम राहिली. सर्वसामान्य माणसाचे कल्याण करणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले व सर्व समाजालाही या कर्त्यव्याच्या अनुरोधाने मार्गदर्शन केले. या काळात महाराष्ट्रात उच्च मानल्या गेलेल्या जातीने आपले वर्चस्व निर्माण केले होते. व ते टिकवण्यासाठी बहुजन समाजावर सामाजिक व धार्मिक बंधने लादली होती. या बंधनातून बहुजन समाजाची सुटका करून त्यांना सुशिक्षित बनविण्यासाठी प्रगतिशील करण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले. या कार्यामुळेच असामान्य व्यक्तिमत्त्वाचा बहुजन समाजाचा लोकनेता म्हणून लोकप्रियता मिळवली. शाहू महाराज हे कागलच्या घाडगे घराण्यातील होते, त्यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला. शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंत होते. त्यांच्या आईचे नाव श्रीमंत राधाबाई साहेब, वडिलांचे नाव जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे हे होते. २ एप्रिल १८९४ रोजी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. त्यांच्या २८ वर्षांच्या कारकिर्दीत महाराजांनी अनेक उल्लेखनीय कार्य केली. त्यांना मिळालेल्या अधिकाराचा उपयोग संस्थानातील सामान्य जणांच्या हितासाठी करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक विषमता दूर करून समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्याच्या हेतूने त्यांनी बहुजन समाजाचे नेतृत्व स्वीकारले. २ एप्रिल १८९४ रोजी अधिकार ग्रहण करताना महाराजांनी प्रजाज जणांना जाहीर केले की, आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट असावेत आमच्या संस्थांचा सर्व बाजूंनी अभ्युदय व्हावा अशी आमची उत्कट इच्छा आहे. त्यांच्या या घोषणेवरूनच महाराजांची प्रजेविषयी कळकळ व कार्य करण्याविषयी त्यांची इच्छा दिसून येते. महाराजांच्या एकूण कार्यात त्यांचे शैक्षणिक कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. महात्मा फुले प्रमाणेच सामाजिक सुधारणेच्या कार्यात त्यांनी शिक्षणाला प्रमुख स्थान दिले, त्यावेळी बहुजन समाजामध्ये मॅट्रिक उत्तीर्ण झालेल्यांची संख्या अल्प होती. खेड्यामध्ये शाळा नव्हत्या, सर्वसामान्य बहुजन समाज अज्ञानानेच व अंधश्रद्धेचे जीवन जगत होता. शिक्षण घेणे हे ब्राह्मणाचे व सावकाराचे काम आहे आपले काम नाही. अशी समाजाची समजूत होती. छत्रपती शाहू महाराजांनी या अज्ञानी बहुजन समाजामध्ये ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करण्याचा निश्चय केला. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय वीर कधीच निपजणार नाहीत, म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. अशी शाहू महाराजांची विचारसरणी होती , बहुजन समाजाप्रमाणेच महाराजांना स्त्री जीवनाच्या मागासले पणाची जाणीव होती. शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना फी माफीची सवलत जाहीर केली. स्त्री शिक्षणा मुळे कुटुंबाचा, समाजाचा अप्रत्यक्षपणे विकास घडवून येतो. स्त्रीला कुटुंबात व समाजात आदराचे व मानाचे स्थान मिळणे शक्य होते. असा महाराजांचा विश्वास होता. शिक्षणाबरोबरच महाराजांचे सामाजिक सुधारनेचे कार्य ही अनमोल आहे. शाहू महाराजांचं कर्तुत्व सांगण्यासाठी वेळ कमी पडेल एव्हढं मोठं कार्य आहे. त्यांनी उभं केलेल्या कामाचा प्रचंड डोंगर आहे. एक माणूस एकाच आयुष्यात काय काय करू शकतो हे सांगण्यासाठी माणसानं शाहू महाराजा कडे बोट दाखवावं असं त्यांचं आयुष्य होतं. मित्रांनो राजश्री शाहू महाराजांचा इतिहास हा अत्यंत प्रेरणादायी आहे. महाराजांचं कार्य हे लोकांसमोर आलेला आहे पण आपल्या नव्या पिढीने खऱ्या अर्थाने समजून घेण्याची आवश्यकता आहे. आपण महाराष्ट्राला फुले शाहू आंबेडकरांचा महाराष्ट्र का म्हणतो? याचं कारण असं आहे की, महात्मा फुलेंनी सामाजिक क्रांतीचा विचार मांडला, तो विचार अमलात आणण्यासाठी लढा ही दिला. त्या विचाराला राजश्री शाहू महाराजांनी आपल्या राज्यामध्ये अमलात आणलं. महात्मा फुलेंनी जो स्वप्न पाहिलं ते स्वप्न अमलात आणलं. आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र भारतासाठी राज्यघटनेमध्ये ते कायदाबद्ध केलं.

म्हणून आपण फुले शाहू आंबेडकरांच नातं सांगतो. आज आपण पाहतो ज्या काही योजना आहेत तसे योजना शाहू महाराजांच्या राज्यात प्रजेसाठी चालू करण्यात आलेल्या होत्या १८९६ वर्षी दुष्काळ पडला होता, तेव्हा शाहू महाराजांनी अन्नधान्य मैसूर येथून मागवून जनतेला खाऊ घातलं. त्यांना मरू दिले नाही, त्यांच्या हाताला काम मिळावं म्हणून शाहू महाराजांनी जनतेसाठी अनेक कामे निर्माण करून दिली. हा सामाजिक परिवर्तनाचा व विकासाचा दृष्टिकोन घेतलेला भारतात ला एकमेव राजा म्हणजे राजश्री शाहू महाराज होय. जातीयवादाचा समूळ नायनाट करण्यासाठी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून समाजामध्ये महात्मा फुलेंचा समतेचा विचार मांडला. अशा या माझ्या लोककल्याणकारी राज्याची महिमा मांडण्यासाठी दिवस रात्र सुद्धा पुरणार नाही. आपला महाराष्ट्र हा साधुसंताचा व महापुरुषांचा महाराष्ट्र आहे असे आपण म्हणतो.पण आज आपण पहात आहोत महापुरुषांच्या विचाराचा आजच्या पिढीला विसर पडतोय? असे म्हणावे लागेल. कारण आज सुद्धा जातीपातीच राजकारण व समाजकारण पाहायला मिळतो आहे, आज राजश्री छत्रपती शाहू महाराज यांची १४९ वी जयंती आहे यानिमित्त महाराज्यांच्या कार्याची ओळख आजच्या पिढीला व्हावी याच साठी या लेखाचे प्रयोजन. माझ्या लोककल्याणकारी राजाला कोटी कोटी नमन...



**शब्दांकन : रमेश महाजनराव भालेराव**
**सह.शिक्षक ईश्वर माध्यमिक विद्यालय**
**सावरगाव (थोट) ता.अहमदपूर जि.लातूर**

# नवोदय प्रवेश परीक्षेत मेरिट आल्याबद्दल स्पंदन मेश्राम, पारुल निमजे विद्यार्थी व पालकांचे सत्कार

*दै.चालु वार्ता, बल्लारपूर, प्रतिनिधी,*
*◀कमलेश नेवारे▶*



**बल्लारपूर :** जनसेवा हीच ईश्वर सेवा मानणारे, आमचे आदर्शस्थान, मार्गदर्शक महाराष्ट्रात विकास पुरुष अशी ख्याती प्राप्त असलेले मा.सुधीर भाऊ मुनगंटीवार जी वने, मत्स्य व्यवसाय तथा सांस्कृतिक कार्ये मंत्री महाराष्ट्र राज्य, पालकमंत्री गोंदिया व चंद्रपूर जिल्हा यांची समाजसेवेची प्रेरणा घेऊन उभारलेली समाजसेवी संस्था सुधीर भाऊ जनसेवा बहुउद्देशीय संस्था बल्लारपूर रजि.नं. चंद्रपूर ००००११३/२०२२ (श्री सुधीर भाऊ मुनगंटीवार फॅन्स क्लब बल्लारपूर) तर्फे आज दिनांक २४.०६.२३ ला नवोदय प्रवेश परीक्षा , ज्या परीक्षेत शहरासाठी राखीव व २० टक्के हें ग्रामीण विभागासाठी राखीव ८० टक्के असते. अशा परिस्थितीत ही संपूर्ण बल्लारपूर शहरातून स्पंदन मेश्राम, पारुल निमजे या दोन विद्यार्थ्यांनी ही परीक्षा उत्तीर्ण नव्हे तर परीक्षेत मेरिट आल्याबद्दल विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे, संस्थे तर्फे बल्लारपूर मधील वरिष्ठ पत्रकार श्रीनिवास उनिवा सर व सुनील टडम जी यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला असून मा.आ. सुधीरभाऊ मुनगंटीवार जी यांनी त्यांना पुढच्या वाटचालीसाठी मार्गदर्शन व शुभेच्छा देण्यात दिल्या असा संदेश पाठविला. या सत्कार कार्यात बल्लारपूर शहराचे वरिष्ठ पत्रकार श्रीनिवास उनिवा सर जी, श्री सुधीरभाऊ मुनगंटीवार फॅन्स क्लब चे अध्यक्ष श्रीकांत आंबेकर जी, सुधाकर सिक्का जी, श्रीनिवास पिसार जी, कमल वर्मा जी, नारायण सुक्का जी, विनोद कोवे जी, सतीश बेमकुरी जी उजव, बुझाडे जी, आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# रिपब्लिकन सेना जिल्हा उपाध्यक्षपदी कैलास पोटफोडे यांची निवड

*दै.चालु वार्ता,*
*उमापूर, प्रतिनिधी,*
*◀कृष्णा जाधव▶*




**उमापूर :** राक्षसभुवन शासकीय विश्रामगृह गेवराईत रिपब्लिकन सेनेची बैठक संपन्न झाली दि.२४ रोजी रिपब्लिकन सेना तालुका अध्यक्ष राधाकिशन भाऊ जाधव यांच्या नेतृत्वाखाली व रिपब्लिकन सेना प्रदेश सचिव रवींद्र यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक आयोजित करण्यात आली होती, या बैठकीला रिपब्लिकन सेना तालुका पदाधिकारी तालुका उपाध्यक्ष जगदीश चव्हाण तालुका सचिव बालप्रसाद, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मा सौ सुरेखा ताई मुंजाळ, महिला आघाडी तालुका अध्यक्ष नूरकस ताई भोसले, चकलांबा सर्कल प्रमुख भैय्या काळे गेवराई सर्कल प्रमुख राज तेलुरे, विलास मुंजाळ, मिथुन सुतार, अदी. तालुका पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी रिपब्लिकन सेनेत कैलास सुदाम पोटफोडे यांची रिपब्लिकन सेना जाहीर प्रवेश घेऊनत्यांना जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली, तसेच सुभाष सुदाम पोटफोडे यांची तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.तसेच धोंडराई सर्कल मधून मा.कुंडलिक सोनवणे यांची निवड करण्यात आली. यावेळी गणेश भोसले, राजेश माळी व असंख्य रिपब्लिकन सेनेचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# हाडोंग्री ध्यान केंद्रात तामिळनाडूच्या शिक्षिकेची हजेरी, उपस्थित साधकांना सुख, समाधान, शांती, आरोग्य प्राप्ती चे धडे

*दै.चालु वार्ता, उपसंपादक, धाराशिव*
*◀नवनाथ यादव▶*

**भूम :** शहराच्या अवघ्या पाच किलोमीटरच्या अंतरावर बालाघाटाच्या डोंगर कुशीमध्ये विस्तीर्ण अशा झाडा झुडपाच्या व विपषणा केंद्र ध्यान केंद्र स्थित असलेल्या जवळपास दोन अडीचशे एकर जमिनीवर असलेल्या या ध्यान केंद्राचं जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पाटील हाडोंग्रीकर यांनी लोकांना निरोगी राहता यावं लोकांना विविध अशा प्रकारच्या वनस्पती या माध्यमातून मिळाव्यात लोकांना आरोग्यदायी आनंदी जीवन मिळावे लाभावे यासाठी या ध्यान केंद्राची स्थापना करण्यात आली आहे.दररोजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये माणूस इतका व्यस्त झालेला आहे हे त्याला आपल्या आरोग्याकडे आपल्या शरीराकडे बघण्यात का सुद्धा वेळ राहत नाही परंतु यातून वेळ काढून आपण हाडोंग्री या ठिकाणी ध्यान केंद्राच्या माध्यमातून या ठिकाणी तालुक्यातील सर्व लोकांना तामिळनाडू येथील शिक्षका आणू ललिता या ध्यान कसे करायचे यापासून आपल्या शरीराला आपल्या मेंदूला काय मिळते आणि आनंदी जीवन कसे जगता येईल यासाठीचे धडे या माध्यमातून उपस्थित साधकांना देण्यात आले.ध्यान केंद्राचे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बाळासाहेब पाटील हाडोंग्रीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य पाटील हे काम पाहत आहेत. लोकांनी या ध्यान केंद्रात येऊन ताण-तणावाच जीवन बाजूला ठेवून आपल्याला सुख समाधान शांती व आरोग्य मिळावे यासाठी आपण या ध्यान केंद्रात यावे विस्तीर्ण व प्रशस्त निसर्ग सौंदर्याने नटलेल्या व विविध औषधी वनस्पती असलेल्या या भागामध्ये मंर्त्यापासून खासदारापर्यंत पोलीस अधीक्षकापासून ते प्रशासनापर्यंत अनेक अधिकाऱ्यांनी भेट देऊन या प्रकल्पाचे कौतुक केल्याचे दिसत आहे. म्हणून एक वेळ भेट देण्याचे आव्हान देखील आदित्य पाटील करताना दिसत आहे.






# प्राणी क्लेश प्रतिबंधक कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करा - निवासी उपजिल्हाधिकारी विवेक घोडके

*दै.चालु वार्ता, उपसंपादक, अमरावती*
*◀श्रीकांत नाथे▶*

**अमरावती :** जास्तीत-जास्त गोवंशाना टॅग करुन जनावरांसाठी सुरक्षितता निर्माण करण्यात यावी. गोवंशाच्या रक्षणासाठी पोलीस प्रशासन व पशुसंवर्धन विभागाने समन्वयाने काम करावे. प्राणी क्लेश प्रतिबंध कायद्याची जिल्ह्यात काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी, अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी विवेक घोडके यांनी आज दिल्या. जिल्हास्तरीय प्राणी क्लेश प्रतिबंधक समितीची त्रैमासिक बैठक निवासी उपजिल्हाधिकारी विवेक घोडके यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसुल भवनात आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते.

जिल्हा पशु संवर्धन उपायुक्त डॉ.संजय कावरे, महापालिकेचे पशु वैद्यकीय अधिकारी डॉ.सचिन बोंद्रे, जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) तपन कोल्हे, पोलीस आयुक्त कार्यालयाचे प्रतिनिधी अनिल कुरळकर, पंचायत समिती सहायक आयुक्त डॉ.राजीव खेरडे तसेच अशासकीय सदस्य, प्रादेशिक परिवहन अधिकारी सिध्दार्थ ठोके, जिल्हा परिषदेचे डॉ.पुरुषोत्तम सोळंके आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

येत्या गुरुवारी बकरी ईद सण येत असून जिल्हा पशु संवर्धन विभागाने मनुष्यबळाचे नियोजन करुन जिल्ह्यातील अधिकृत पशुवधगृहामध्ये जनावरांची तपासणी करावी. जनावरे विक्रीबाबतची माहिती पोलीस प्रशासनाने घेऊन त्यावर तात्काळ कार्यवाही करावी. प्राणीक्लेश प्रतिबंध कायद्यानुसार अधिकाधिक कारवाया करण्यात याव्यात. याबाबत जनजागृती करण्यासाठी शहरी तसेच ग्रामीण भागातील स्थानिक नागरिकांचा सहभाग घ्यावा, असे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम १९९५ तसेच प्राण्यांना क्रुरतेने वागविणास प्रतिबंध अधिनियम १९६० च्या तरतूदीनुसार संपूर्ण गोवंश हत्याबंदी कायदा लागू झालेला आहे.यामध्ये कोणत्याही प्रकारचा गोवंश जसे गाय, वळू, बैल या प्राण्यांची कत्तल करण्यास संपूर्ण मनाई करण्यात आली आहे. या कायद्याचे पालन करण्यासाठी सदर समितीच्या सदस्यांमध्ये चर्चा करण्यात आली. अमरावती महानगरपालिका पशु संवर्धन विभाग यांनी पशु पालकांना नियमांची माहिती दिली. तसेच सभेमध्ये अशासकीय सदस्यांनी जनावरांना टॅगिंग करण्याबाबत कार्यवाही करण्याची मागणी केली.

त्यावर उपायुक्त पशु संवर्धन डॉ.संजय कावरे यांनी महानगरपालिका क्षेत्रामध्ये जिल्हा पशु वैद्यकीय सर्व चिकित्सालय,अमरावती येथे पशुंना टॅगिंग करण्यात येत असल्याचे सांगितले. यासाठी संबंधित पशु पालकांनी स्वत:चे आधार कार्ड तसेच जनावर त्यांच्या मालकीचे असल्याचा पुरावा देणे आवश्यक आहे. बकरी ईदच्या अनुषंगाने शहरात जनावरांच्या तपासणीसाठी बॉर्डर सिलींग ठिकाण व कत्तलखान्यावर तपासणीकरिता पशुधन विकास अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**पशुधन विकास अधिकारी यांची नावे व संपर्क क्रमांक**

वलगाव पोलीस ठाण्यांतर्गत रेवसा नाका येथे बॉर्डर सिलींग ठिकाण निर्माण करण्यात आले असून पशुधन विकास अधिकारी डॉ.सागर ठोसर (९०४९०७१५००), नांदगाव पेठ पोलीस ठाण्यांतर्गत नांदगाव पेठ टोलनाका येथे बॉर्डर सिलींग ठिकाण निर्माण करण्यात आले असून पशुधन विकास अधिकारी डॉ.देवराव हटकर (८२०८५०५७४०), खोलापुरी गेट पोलीस ठाण्यांतर्गत भातकुली नाका येथे बॉर्डर सिलींग ठिकाण निर्माण करण्यात आले असन पशुधन विकास अधिकारी डॉ.अरुण इंगळे (९८५०८६८५२४), गाडगे नगर पोलीस ठाण्यांतर्गत कठोरा जकात नाका येथे बॉर्डर सिलींग ठिकाण निर्माण करण्यात आले असून पशुधन विकास अधिकारी डॉ.स्वप्निल माळनकर (७७०९२४८५८३), फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यांतर्गत एस.आर.पी.कॅम्प वडाळी नाका येथे बॉर्डर सिलींग ठिकाण निर्माण करण्यात आले असून पशुधन विकास अधिकारी डॉ.अनिल मोहोड (९८९०४६९६७६), बडनेरा पोलीस ठाण्यांतर्गत बडनेरा जुनी वस्ती, रेल्वे फाटकाजवळ येथे बॉर्डर सिलींग ठिकाण निर्माण करण्यात आले असून पशुधन विकास अधिकारी डॉ.अनिल किटुकले (७६७८७६०११२), राजापेठ पोलीस ठाण्यांतर्गत भानखेडा तलाव परिसर येथे बॉर्डर सिलींग ठिकाण निर्माण करण्यात आले असून पशुधन विकास अधिकारी डॉ.सचिन राऊत (८६००५७९८०९), फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यांतर्गत मार्डी रोड येथे बॉर्डर सिलींग ठिकाण निर्माण करण्यात आले असून पशुधन विकास अधिकारी डॉ.उदयकांत तायडे (८२७५३०७५६१६१) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्राणी संरक्षण कायद्याचे पालन करुन सर्वांनी शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन घोडके यांनी केले आहे.

# संविधान आर्मीच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व शालेय उपयोगी साहित्य वाटप



*दै.चालु वार्ता, बुलढाणा, प्रतिनिधी,*
*◀सिद्धार्थ तायडे▶*

**बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर येथे मलकापूर. संविधान आर्मीचे संस्थापक अध्यक्ष जगन भाई सोनवणे यांच्या मार्गदर्शनानुसार दि.२५. जून रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती मलकापूर येथे वर्ग १०व१२ वी चे गुणवंत विद्यार्थी तसेच उच्च व तंत्र शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सन्मान व वर्ग १ ते ९ वि पर्यंत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना शाळा उपयोगी साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमांमध्ये आशिष नितीन इंगळे. विशाल शरद मोरे. अस्मिता किशोर मोरे. प्रियंका शरद मोरे. सुमेध किशोर मोरे. सम्यक गजानन झणके. कोमल सुनील झनके. स्नेहल सुनील इंगळे. पायल विलास झनके. प्रज्ञा दीपक अवसरमोल. प्रेरणा कैलास इंगळे. प्रशिक कैलास इंगळे. सिद्धार्थ संजय चोपडे सह असंख्य विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संविधान आर्मीचे विदर्भ महामंत्री भिवाभाऊ चोपडे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे स्वागत करून विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तू भेट म्हणून दिल्या तसेच विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी आर एन वानखेडे गुरुजी, प्रभाकर इंगळे, गुरुजी. मधुकर निकम. अशोक भालशंकर, जनार्दन झनके, वाकोडे सर सह असंख्य विद्यार्थी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मराठी शाळा टिकली पाहिजे आणि टिकवली पाहिजे ही आपल्या सर्वांची जबाबदारी.... रामेश्वर बचाटे (शालेय व्यवस्थापन समिती सदस्य)...

*दै.चालु वार्ता*
*◀पालम, प्रतिनिधी▶*

**पालम :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा वडगाव स्टे. ता. सोनपेठ जि. परभणी येथे दिनांक २० जून २०२३ रोजी जिल्हा अंतर्गत बदली मुळे उपस्थित झालेले उच्च श्रेणी मुख्याध्यापक तुकाराम सावंत साहेब, शिक्षक श्रीधर सावंत सर, कुंडलिक कांबळे सर व श्रीमती ढेले मॅडम यांचा स्वागत समारंभ शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य रामेश्वर बचाटे राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस जिल्हा सरचिटणीस परभणी यांनी आयोजित केला होता. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. उच्चश्रेणी मुख्याध्यापक सावंत साहेब यांचे स्वागत शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य रामेश्वर बचाटे राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस जिल्हा सरचिटणीस परभणी यांनी केले. सावंत सर यांचे स्वागत पालक अशोक बचाटे यांनी केले. कांबळे सर यांचे स्वागत माधव बचाटे यांनी केले व श्रीमती ढेले मॅडम यांचे स्वागत शालेय व्यवस्थापन समिती सदस्या सौ.शकुंतला रामेश्वर बचाटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बेंबडे सर यांनी केले. शाळेमध्ये नव्याने रुजू झालेले शिक्षक कांबळे सर यांनी अनुभव कथन करताना आपला पूर्वीचा प्रवास सांगितला व येथून पुढेही सर्व विद्यार्थी व पालक यांना अपेक्षित अशा प्रकारचे कार्य करण्याचे वचन त्यांनी दिले व व शालेय व्यवस्थापन समिती व पालकांनी केलेल्या स्वागत सत्कराबद्दल त्यांनी आभार मानले. मराठी माध्यमाच्या शाळा टिकल्या पाहिजेत मातृ भाषेतून शिक्षण हे सर्वोत्तम शिक्षण असते त्यातूनच माणसाचा सर्वांगीण विकास होतो असे त्यांनी सांगितले. अशाच प्रकारचे सहकार्य सर्व पालक गावकरी व शालेय व्यवस्थापन समितीने नेहमी करावे असे त्यांनी आपले मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करताना उच्च श्रेणी मुख्याध्यापक सावंत साहेब यांनी वडगाव जिल्हा परिषद शाळेची मुख्याध्यापक पदाची जबाबदारी चांगले व लोकापेक्षित काम करून पार पडण्याचा प्रयत्न करेन असे वचन सर्वांना दिले. मराठी शाळा टिकली पाहिजे आणि टिकवली पाहिजे ही आपल्या सर्वांची जबाबदारी अशा सूचना आणि अपेक्षा त्यांनी व्यक्त केल्या. यानंतर लागलीच इयत्ता पहिली प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा शाळा पूर्वतयारी मेळावा आयोजित करण्यात आला होता. पहिली साठी प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांच्या अपेक्षित सर्व प्रकारच्या नोंदी कार्डवर घेण्यात आल्या सर्व विद्यार्थ्यांचे पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले. या प्रसंगी शाळेतील मुख्याध्यापक सावंत साहेब, शिक्षक सावंत सर, कांबळे सर, म्हेत्रे सर, कदम सर, बेंबडे सर, श्रीमती ढेले मॅडम, शा.पो.आ. मदतनीस पारसनाथ सुरंजे, पालक रामेश्वर बचाटे, अशोक बचाटे, माधव बचाटे, रोकडोबा बचाटे, गणेश बचाटे, दत्ता बचाटे आदि पालक उपस्थित होते....

# देगलूर शहरातील विविध कार्यालयांमध्ये बायोमेट्रिक मशीन गायब

*दै.चालु वार्ता, देगलूर, प्रतिनिधी,*
*◀संतोष मंनधरणे▶*

**देगलूर :** देगलूर शहरातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये कर्मचारी कार्यालयात उशीरा येतात व लवकर जातात नागरिकांना वेळेचं बंधन पण कर्मचाऱ्याला मात्र वेळेचे बंधन राहत नाही असं देगलूर मधील प्रत्येक कार्यालयामध्ये दिसून येत आहे. शासकीय कार्यालयात कुठल्याही कामाला गेले की प्रशासन नागरिकांना विविध नियम, कायदे पुढे करत असते.... आता जनतेने देखील प्रशासनाला बायोमेट्रिक हजेरी ची आठवण करून देणे आवश्यक आहे... ५ दिवसांचा आठवडा व ७वा वेतन आयोग लागू करताना सरकारने सर्व नोकरशाही ला बायोमेट्रिक हजेरी अनिवार्य केलेली आहे...जनतेला नियम शिकवणारी नोकरशाही मात्र स्वतः ला लागू असणाऱ्या नियमाला केराची टोपली दाखवत आहे.... यावर चा सर्वोत्तम उपाय म्हणजे नागरिकांनी आपापल्या विभागातील कार्यालातील प्रमुखांना आरटीआय अंतर्गत बायोमेट्रिक हजेरी ची मागणी करणे.... सर्व नोकरशाही चे वेतन हे नागरिकांच्या पैशातून केले जात असल्याने नागरिकांचा त्यांच्यावर हक्क आहे...जनता म्हणजेच आपण लोकशाही चे मालक आहोत हे लक्षात ठेवा....

आपणाला हेच माहिती नाही की प्रशासनाची कार्यालयीन वेळ सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ आहे....

नागरिकांना १ मिनिट उशीर झाला **Window CLOSED** असा बोर्ड नागरिकांच्या तोंडावर मारला जातो मग त्यांनी देखील कार्यालयीन वेळेचे पालन करणे गरजेचे नाही का ? नियम मात्र सामान्य नागरिकांना शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांना नाही का असं कुठेतरी प्रश्न जनतेच्या मनात निर्माण होत आहे.




# छत्रपती शाहू राजे योगा गुप कडून छत्रपती शाहू राजांची जयंती साजरी

*दै.चालु वार्ता,*
*लातूर जिल्हा, प्रतिनिधी,*
*◀राठोड रमेश पंडित▶*

**लातूर :** रयतेचे राजे आरक्षणाचे जनक राजश्री शाहू महाराज यांची शतकोत्तर जयंती अहमदपूर येथील छत्रपती शाहू राजे योगा गुप तर्फे सकाळी सात वाजता छत्रपती शाहू राजे योगा गुप मैदानावर मान्यवरांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराजांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी वाढदिवसानिमित्त



हिरामणी धसवाडी कर सर, पंढरी वाघमारे सर, श्री माधव तिगोटे यांचा वाढदिवसानिमित्त मान्यवरांच्या हस्ते शाल पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. या जयंती सोहळ्याप्रसंगी छत्रपती शाहू राजे योगा गुपचे अध्यक्ष एन डी राठोड, बोधिसत्व फाउंडेशनचे अध्यक्ष श्री आर जी कांबळे, हिरामणी धसवाडीकर सर, यांनी छत्रपती शाहू राजे यांच्या कार्याबाबत उपस्थितांना माहिती दिली. कार्यक्रमाची प्रस्तावना छत्रपती शाहू राजे योगा गुप चे सन्माननीय सदस्य अविनाश मंदाडे यांनी केली तर सूत्रसंचालन एनडी राठोड यांनी केले तसेच आभार प्रदर्शन चे काम श्री गणेश वाघमारे यांनी मानले.

# सामाजिक न्यायाचे महामेरू राजर्षी शाहू महाराज.... प्रा.भीमराव दिपके सिंधू महाविद्यालय देगलूर..

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात राजश्री शाहू महाराजांचे नाव आदर्श राजा, बहुजन व दलित समाजाचे नेते प्रजाहित दक्षक राजा अशा संबोधितांनी उल्लेख केले जाते लोकनेते राजश्री शाहू महाराजांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील घाटगे घराण्यातील २६ जून १८७४ रोजी झाला त्यांचे मूळ नाव यशवंतराव होते. त्यांनी महाराष्ट्रातील प्रथम शिक्षणाचे मोफत कायदा त्यांनी केलेला आहे त्यांनी सामाजिक कार्याची सुरुवात आपल्या संस्थानातून सुरूकेली बहुजन समाजातील लोकांना मोफत आणि शक्तीचे शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले त्या काळात फक्त एकच वर्ग शिक्षण घेत होता त्यासाठी त्यांनी तळागाळातील लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी १९१७ मोफत आणि सक्तीचा कायदा त्यांनी केला. राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणाप्रमाणेच समाजातील जातिभेद नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले त्यांनी संस्थानातील सार्वजनिक पानवटे आणि मंदिरे सर्वांसाठी खुली केली गंगाराम कांबळे या महार व्यक्तीला कोल्हापूर शहरातील भर रस्त्यावर हॉटेल काढून दिले व स्वत: चहा घेऊ लागले व जातीयता नष्ट करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रात प्रथम कार्य केले.

राजर्षी शाहू महाराज खऱ्या अर्थाने बहुजन समाजाच्या कल्याणाची काम त्यांनी केले शेतकऱ्याच्या हितासाठी त्यांनी जलसंधारणाचे काम राधानगरी धरणाच्या माध्यमातून त्यांनी केलेले आहे. उद्योगधंद्याच्या निर्मितीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी राजश्री शाहू महाराज यांनी १८९५ मध्ये शाहूपुरी या बाजारपेठेची निर्मिती केली राजर्षी शाहू महाराजांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी भोगावती धरणाची निर्मिती केली मोफत सक्तीचा कायदा १९१७ निर्माण करून खऱ्या अर्थाने शेतकऱ्याचा हिताचे काम त्यांनी केले. राजश्री शाहू महाराजांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना परदेशात जाण्यासाठी शिष्यवृत्तीची मदत केली म्हणून आज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधानाचे शिल्पकार शिल्पकार झाले भारतीय संविधानाच्या माध्यमातून आज बहुजन समाजातील प्रत्येक नागरिकांना मोफत विविध कायदे अधिकार व तसेच शिक्षण घेण्याचा अधिकार राजश्री शाहू महाराजांनी व तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक क्रांतीने मिळालेला आहे राजश्री शाहू महाराजांचे विचार हे बहुजन समाजातल्या सर्वांनी अंगीकारण काळाची गरज आहे कारण राजश्री शाहू महाराज हे संपूर्ण समाजातल्या उन्नतीसाठी आपले आयुष्य वेचले होते त्यासाठी कोल्हापूरच्या संस्थानापासून ते संपूर्ण महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. शाहू महाराजांच्या नंतर महाराष्ट्रामध्ये त्यांचेच विचार अंगीकारून राष्ट्रसंत गाडगेबाबा यांनी देखील पंढरपूर येथे शैक्षणिक संस्था सुरूकरून मागासलेल्या विद्यार्थ्यांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण दिले त्यानंतर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी देखील १९१९ मध्ये रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण त्यांनी दिले राजश्री शाहू महाराजांच्या विचाराने आज अनेक सामाजिक उन्नतीच्या योजना पुढे आलेल्या आहेत राजश्री शाहू महाराजांमुळे आरक्षणाचा मिळालेले आहेत आज राजश्री शाहू महाराजांमुळे उच्च शिक्षण घेण्यासाठी बहुजन समाजातल्या विद्यार्थ्यांना अनेक शिष्यवर्ती मिळत आहेत राजश्री शाहू महाराजांनी समाजातली अंधश्रद्धा जातीयता नष्ट करण्याचं काम त्यांनी केलं म्हणूनच राजश्री शाहू महाराजांच्या विचाराची पुन्हा एकदा एकविसाव्या शतकातील बहुजन समाजाला काळाची गरज आहे

**प्रा.भीमराव दिपके,**
**सिंधू महाविद्यालय देगलूर.**

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीदिनी जि प राळगा शाळेत शालेय विद्यार्थांना गणवेश वाटप

*दै.चालु वार्ता, लातूर जिल्हा, प्रतिनिधी,*
*◀राठोड रमेश पंडित▶*

**लातूर :** जात पंथाची पर्वा न करता सर्वांना प्राथमिक शिक्षण देणे तसेच ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्याचे मोलाचे कार्ये शाहु महाराजांनी केले असे प्रतिपादन सरपंच राजकुमारजी नरवटे यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन करताना केले. जयंती दिनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राळगा येथे आयोजित गणवेश वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ग्रामपंचायत राळगा सरपंच आदरणीय राजकुमारजी नरवटे, शाळा व्यवस्थापन समिती राळगा चे अध्यक्ष



आदरणीय लक्ष्मणरावजी खांडेकर, सतीश नरवटे, विकास चव्हाण, रवि पवार, मारोती पवार शाळेचे मुख्याध्यापक मद्देवाड ए के, गुळवे एस पी, पवार एस बी तसेच अंगणवाडी ताई श्रीमती देवकते चंद्रकला आदींची उपस्थीती होती.

# 'शासन आपल्या दारी' या मोहिमअंतर्गत महाराष्ट्र प्राथमिक बीएड शिक्षकाच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन


*दै.चालु वार्ता, माळाकोळी, प्रतिनिधी,*
*◀तानाजी मारकवाड▶*

**माळाकोळी :** ...,''शासन आपल्या दारी' या मोहीमेअंर्तगत महाराष्ट्र राज्याचे विद्यमान मूख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व ग्रामीणविकास मंत्री गिरीषजी महाजन यांना महाराष्ट्र राज्य प्राथमिक बीएड पदविधर शिक्षकमंच-शाखा नांदेड यांच्यावतीने निवेदन देण्यात आले. आपल्या चळवळीचे संस्थापक राज्याध्यक्ष आकाराम ओंबासे यांच्या मार्गदर्शनानुसार सदर निवेदन देण्यासाठी सन्माननीय जिल्हाध्यक्ष .विश्वेश्वर वडिले, सरचिटणीस सूभाषजी पानपट्टे, कार्याध्यक्ष सुधाकर थडके, कोषाध्यक्ष संजय हंकारे, महिला आघाडी अध्यक्षा सौ आशा शेटे, जिल्हानेते व्यंकट गंदपवाड, सुभाष चव्हाण, महिला आघाडी सरचिटणीस सौ.अनिता दाणे, कार्याध्यक्षा सौ.महानंदा पवळे (कदम), कोषाध्यक्षा सौ.शांता एंगडे आदि मान्यवरासह प्रत्यक्ष भेट घेऊन मुख्यमंत्री महोदय व ग्रामविकास मंत्री महोदय यांना आपल्या संघटनेच्या वतीने कार्यरत बीएड पदवीधर प्राथमिक शिक्षक व सेवा कालावधीत होत असलेला पदोन्नती व स्पर्धा परीक्षा या अनुषंगाने होत असलेला अन्याय आणि त्यास अनुसरून केलेली न्यायात्मक मागणी तसेच सदर निवेदन मान्यवर मंत्रीमहोदयांना देण्यात आले. मुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्री महोदय यांनी स्वतः निवेदन वाचन करून भावना समजून घेतल्या.

# डॉ.रवींद्र शोभणेंच्या संमेलनाध्यक्ष पदी निवडीचे आदमपुरात स्वागत.....

*दै.चालु वार्ता, ग्रामीण, प्रतिनिधी,*
*◀माणिक सुर्यवंशी▶*

**नांदेड :** मौजे आदमपूर,(ता.बिलोली) येथे जेष्ठ साहित्यिक प्रा.डॉ.रवींद्र शोभणे यांची आगामी ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल आदमपूर परिसरातील शब्द सारस्वतांनी स्वागत आणि अभिनंदन केले आहे. जळगांव मधील अमळनेर येथे ९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नियोजित आहे. नागपूर येथील कथाकार, कादंबरीकार, समीक्षक डॉ.रवींद्र शोभणे यांची एकमताने साहित्य महामंडळाने निवड केली. याआधी १९५२ साली कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली पहिले संमेलन अमळनेर येथे संपन्न झाले होते. २०२४ साली हे दुसरे संमेलन नियोजित आहे. पूज्य साने गुरूजींच्या पावन कर्मभूमीत हे संमेलन होणार आहे. याचाही अगाध आनंद आहे! कथा कादंबरी अनुषंगाने वास्तव समाजभान, सूक्ष्म निरीक्षण शक्ती, वैदर्भीय वऱ्हाडी बोलीभाषेचा लहेजा, लयपूर्ण संवादशैली,वाचनावरील पकड, अशा वैशिष्ट्यपूर्ण गुणांनी शोभणे यांचे लेखन व्यापलेले आहे.एक सकस आणि सुजाण साहित्यिक संमेलनाध्यक्ष पदी निवडले गेल्याचा आनंद आहे! सदरील छोटेखानी स्वागत व अभिनंदन समारंभात जेष्ठ बालसाहित्यिक शं.ल.नाईक, प्रा.संदीप भुरे,ह.भ.प.मारोती महाराज खतगांवकर, जाफर आदमपूरकर, दर्शन भंडारे, मारोती वाघमारे,बालाजी पेटेकर, अनिल वाघमारे,अ.बा.शेख हिप्परगेकर आदी मान्यवर उपस्थित होते.




# जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नांदेड येथे राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांची जयंती साजरी



*दै.चालु वार्ता ◀नांदेड, प्रतिनिधी▶*

**नांदेड :** पुरोगामी विचारांचा पुरस्कार करत शाहू महाराजांनी जातीभेद व अस्पृश्यता निवारणासाठी लढा दिला आणि सामाजिक परिवर्तन घडवले. शिक्षणाचे महत्त्व जाणून बहुजनांसाठी शिक्षणाची दारे खुली करत त्यांना मुख्य प्रवाहात आणले. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात भरीव सुधारणा करणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीदिनी दिनांक २६ जून २०२३ रोजी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नांदेड येथे, समितीचे उपायुक्त तथा सदस्य माननीय श्री.अनिल शेंदारकर साहेब यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यालयात शाहू महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी वैजनाथ मुंडे, मुकुंद मुळे, सिद्राम रणभिरकर, संजय पाटील, शिवाजी देशमुख, बाबू कांबळे, ओमशिवा चिंचोलकर सोनु दरेगावकर यांच्यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते.